cmyk

## संपादकीय

### एकत्र आलात मात्र टिकून राहा !

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र येत असल्याचे वातावरण आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी दोन ठाकरेंनी युती केली असून, जागावाटप अंतिम झाले आहे. २० वर्षांनंतर हे ठाकरे कुटुंब एकत्र येत असल्याचे दिसते, ज्याची घोषणा २४ डिसेंबरला करण्यात आली आहे. हे मुंबईच्या राजकारणासाठी मोठे पाऊल आहे,


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२३७ | गुरूवार दि.२५ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### माजी मंत्री सुरूपसिंग नाईक यांचे निधन

नंदुरबार : काँग्रेसचे भीष्म पितामह माजी मंत्री सुरूपसिंग हि–या नाईक यांचे ८८ व्या वर्षी दु:खद निधन झाले आहे. गांधी परिवाराचा सच्चा सेवक म्हणून त्यांची ओळख होती. इंदिरा गांधींपासून तर राहुल गांधींपर्यंत नाईक कुटुंबांचे घरोब्याचे संबंध आहेत. इंदिरा गांधी यांनी सुरूपसिंग नाईक यांना आदिवासींचा सच्चा सेवक म्हणून गौरवले होते. ते काँग्रेसचे आमदार शिरीषकुमार नाईक यांचे वडील आहेत. गुरुवारी सकाळी ११ च्या सुमारास त्यांच्या गावी नवापूर तालुक्यातील नवागाव येथे अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### भाजपकडून पैसा आणि जातीचे राजकारण

मुंबई : मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धवसेना आणि मनसे यांच्यात झालेल्या युतीवर उद्धवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. हा क्षण महाराष्ट्र आणि मुंबईकरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेच मुंबईला हिरवा रंग देण्याचा प्रयत्न केला जातोय, भाजपच्या आरोपावर आदित्य ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली.युतीबद्दल भाष्य करताना मुंबई आणि महाराष्ट्राच्या हितासाठी आम्ही जी लढाई लढत आहोत, त्यासाठी सर्वांना एकत्र आणणे ही एक मोठी ताकद आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी आणि मुंबईकरांच्या भविष्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

### सोने–चांदीच्या दराने मोडले सर्व रेकॉर्ड

जळगाव : जळगाव सराफा बाजारात एकाच दिवशी चांदीमध्ये १२,००० रुपयांची सुसाट वाढ दिसून आली. ग्राहकांनी सकाळी सकाळी गर्दी केली. पण भाव पाहताच अनेकांची बोबडी वळाली. आतापर्यंतचे सर्व रेकॉर्ड चांदीने मोडले आहेत.जळगावातील सराफा बाजारात चांदीच्या दरात पुन्हा विक्रमी वाढ झाली आहे. गेल्या २४ तासांत चांदीच्या दरात तब्बल १२ हजार रुपयांची वाढ झाली आहे. चांदीचे दर जीएसटीसह २ लाख २८ हजार ६६० रुपयांच्या ऐतिहासिक विक्रमी उच्चांकावर पोहोचले. सोन्याच्या दरात देखील ७०० रुपयांची वाढ झाली. जीएसटीसह सोन्याचे दर १ लाख ४० हजार ८०१ रुपयांच्या विक्रमी उच्चांकीवर पोहोचले.

### अहिल्यानगर; एमआयएम २० जागा लढविणार

अहिल्यानगर :महापालिकेच्या निवडणुकीत प्रथमच एमआयएमची एन्ट्री होणार आहे. शहरातील पाच प्रभागांतील २० जागा लढविण्याचा निर्णय एमआयएमने घेतला असून, लवकरच इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.महापालिकेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास मंगळवारपासून सुरुवात झाली आहे. सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. एमआयएमने महापालिका निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी केली आहे. शहरातील प्रभाग क्रमांक ४, ५, १०, ११ आणि १२ मध्ये मस्लिम मतदार आहेत. या प्रभागांमध्ये एमआयएमकडून उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविले जाणार आहेत.

### महायुतीत भागीदार वाढवू नका : आठवले

पुणे :रिपब्लिकन पक्ष भारतीय जनता पक्षाचा सच्चा सहकारी आणि महायुतीतील भागीदार आहे. महायुती परिपूर्ण झाली असून यापुढे त्यात भागीदार वाढवू नका,असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय नेते व केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी केले. पुणे महापालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला १२ जागा मिळाव्यात अशी मागणी त्यांनी केली.पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने 'संकल्प मेळाव्याचे आयोजन केले होते.

### एमपीएससी'ची ८७ जागांसाठी भरती जाहीर

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित, गट–अ आणि गट–ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ ची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. या भरतीद्वारे राज्य सेवा (सामान्य प्रशासन विभाग) आणि महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवा (महसूल व वन विभाग) यांमध्ये एकूण ८७ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. अर्ज करण्याची मुदत ३१ डिसेंबर २०२५ ते २० जानेवारी २०२६ पर्यंत आहे.या भरती प्रक्रियेत एकूण ८७ जागांसाठी अर्ज मागवण्यात आले आहेत. यामध्ये राज्य सेवेतील ७९ आणि महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवेतील ८ जागांचा समावेश आहे. अर्जदार ३१ डिसेंबर २०२५ पासून २० जानेवारी २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करू शकतील.

# २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणणार !

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे नागपूरमध्ये प्रतिपादन

**नागपूर । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने नैसर्गिक शेती मिशन गती देण्याचा निर्णय घेतला असून, पुढील दोन वर्षांत २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे लक्ष्य असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नागपूर येथील लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. नैसर्गिक शेतीबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, ''राज्यातील शेतीची उत्पादकता वाढवणे, दर्जा सुधारणे आणि मातीचे आरोग्य जपणे या उद्देशाने नैसर्गिक शेतीमुळे शेतकऱ्यांना थेट लाभ होणार असून जमिनीचा ऱ्हास रोखण्यास मदत होईल. मातीचे आरोग्य बिघडणे, वाढती उत्पादनखर्चाची समस्या आणि हवामान बदलाचा ताण अशा अनेक आव्हानांना सध्या शेतीला सामोरे जावे लागत आहे.'' असे त्यांनी प्रतिपादन केले.**

केंद्र आणि राज्य सरकारचे नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. परंतु शेतकरी मात्र नैसर्गिक शेती पद्धतीत उत्पादन घटत असल्याचे सांगतात. त्यामुळे शेतकरी नैसर्गिक शेतीला पसंती देत नाहीत. केंद्र आणि राज्य सरकार मात्र नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी जोर लावत आहे. नैसर्गिक शेती आणि संस्थात्मक सहभागातून वेगाने वाढणारी परिपत्र अर्थव्यवस्था या दोन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या दोन्हींच्या माध्यमातून शेती, अन्न प्रक्रिया आणि संबंधित क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर हरित रोजगारनिर्मिती होईल, असा दावाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. तसेच हवामान बदलाचा शेतीवर वाढता परिणाम लक्षात घेता, दीर्घकालीन आणि ठोस उपाय म्हणून नैसर्गिक शेतीकडे वळणे



▶▶ पान २ वर

# अखेर मनसे–उबाठाच्या युतीची घोषणा; समर्थकामध्ये जल्लोष

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू असलेल्या मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीची आज बुधवारी (ता. २४ डिसेंबर) घोषणा झाली आहे. दुपारी १२.३० वाजता राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे वरळीतील 'हॉटेल ब्लू सी' या ठिकाणी पोहोचले. त्यानंतर पत्रकार परिषदेत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सुरुवात केली. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी संबोधित केले. पण ज्या युतीच्या घोषणेची प्रतीक्षा सर्वांना होती, ती घोषणा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडून करण्यात आली.



शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या युतीच्या घोषणेसाठीच्या कार्यक्रमाची सुरुवात खासदार संजय राऊत यांनी केली. आजारी असताना सुद्धा राऊत पुन्हा एकदा राजकारणाच्या आखाड्यात उतरले असून त्यांनी दोन्ही भावांना एकत्र आणण्याचे काम केले आहे. यावेळी त्यांनी म्हटले की, आजचा दिवस सुवर्णअक्षरांनी लिहिला जाईल. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश ज्याप्रमाणे ▶▶ पान २ वर

### दिल्लीच्या डोळ्यात मुंबई खुपतेय

आज दिल्लीतील सत्ताधीशांच्या डोळ्यांत मुंबई खुपत आहे. आम्ही कर्तव्य म्हणून एकत्र आलो आहोत आणि आता हे नाते तुटणार नाही. जे मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे स्वप्न पाहत आहेत, त्यांचा राजकारणातून खात्मा केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. भाजपा म्हणतेय 'कटेंगे तो बटेंगे', पण मी सांगतो चुकाल तर संपाल. मराठी माणसाने आता एकत्र येण्याची वेळ आली आहे, असे आवाहनच यावेळी उद्धव ठाकरेंनी केले.

# तमाशाच्या फडात मारामाऱ्याचा आखाडा



**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील सोनीगावजवळ येथे म्हसोबा यात्रेच्यानिमित्त तमाशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याचं पाहावयास मिळालं. मात्र, रात्री ११ वाजेच्या सुमारास हा कार्यक्रम सुरू असताना अचानक सुधीर प्रकाश वैरागे नावाच्या तरूणाला एका टोळक्याकडून लाकडी काठ्या आणि लाथा बुक्क्याने बेदम मारहाण करण्यात आली असल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे.**

व्हिडिओमध्ये दिसत आहे की, या तरुणालातमाशाच्या स्टेजवरच मारहाण करत असल्याचं दिसत आहे. या घटनेमध्ये ▶▶ पान २ वर

# किडनी रॅकेट प्रकरणी मास्टरमाईंड अटकेत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

**किडनी रॅकेट प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला चंद्रपूर पोलिसांनी रविवारी रात्रीच्या सुमारास सोलापूर येथून अटक केली. कृष्णा, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याला सोमवारी न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी मंगळवारी आयोजित पत्र परिषदेत दिली.**

नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील ३६ वर्षीय शेतकरी रोशन शिवदास कुळे यांनी सावकारी कर्जाच्या जाचाला कंटाळून आपली किडनी विकल्याचे प्रकरण उघडकीस आले. ▶▶ पान २ वर

# राज्यात पुन्हा राजकीय भूकंपाची शक्यता केंद्रबिंदू बीड

**मुंबई/ बीड । प्रतिनिधी**

**राज्याच्या राजकारणामध्ये नेहमी काही ना काही घडामोडी होत राहतात यापूर्वी शिवसेना राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांमध्ये झालेले राजकीय भूकंप आपण पाहिले आहेत मात्र जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीपूर्वी पुन्हा एक राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून या राजकीय भूकंपाचा केंद्रबिंदू बीड असण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे.**

गेल्या काही महिन्यापासून राज्यातील राजकीय वातावरण दूषित होत चाललेले आहेत विशेषता यामध्ये मराठा ओबीसी हा वाद सुरू असून शासन फक्त बघ्याची भूमिका घेत असल्याची दिसत आहे प्रत्यक्षात मराठा ओबीसी कुठेही वाद नसला तरी समाज माध्यमावर मात्र टोकाची टीका केली जात आहे एवढेच काय पण या टिकीचे धनी राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री काही नेते होताना दिसत आहेत अशातच राजकीय पक्ष निवडणुका जिंकण्यासाठी वेगवेगळ्या शकाल लढवतानाही दिसतात कोणता समाज आपल्या बाजूने राहील त्यासाठी प्रयत्न केले जात आहे पण आता याच राजकीय परिस्थितीमध्ये पुन्हा एकदा एका पक्षात राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे या राजकीय भूकंपाचा केंद्रबिंदू बीड ठरणार असल्याचेही दिसत आहे गेले काही महिने शांत असलेले जिल्ह्यातील आणि जिल्ह्याबाहेरील नेते हे पक्षातील नेतृत्वावर आणि अंतर्गत पक्षातील गटबाजीला वैतागल्याचे दिसत आहे अधून मधून वरिष्ठ नेत्यांच्या होणाऱ्या भेटी त्यातून मिळणारे संदेश हे पाहता राज्यातील एका मोठ्या पक्षातील एक गट दुसऱ्या पक्षात जाणार असल्याचे दबक्या आवाजात बोलले जात आहे विशेषता याचा केंद्रबिंदू देखील ▶▶ पान २ वर

# मंत्री राणेंसह तीघा विरुद्ध अटक वॉरंट

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी**

**कोरोना कालावधीतील एका आंदोलनप्रकरणी कुडाळ न्यायालयाने भाजपच्या तीन नेत्यांना चांगलंच धारेवर धरलं आहे. मंत्री नितेश राणे आमदार प्रवीण दरेकर आणि आमदार प्रसाद लाड यांना कुडाळ न्यायालयाने दणका दिला. राज्याचे कैबिनेट मंत्री तथा पालकमंत्री नितेश राणे यांना न्यायालयाकडून अजामीनपात्र अटक वॉरंट जारी करण्यात आलं आहे.**

संविधान बचाव आंदोलन केल्याप्रकरणी आमदार प्रविण दरेकर आणि आमदार प्रसाद लाड यांनाही अजामीनपात्र अटक वॉरंट जारी करण्यात आलं आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात २६ जून २०२१ रोजी झालेल्या ओबीसी आंदोलनात सहभाग घेतल्याप्रकरणी ▶▶ पान २ वर

# नगराध्यक्षांना आता मतदानाचा अधिकार

### फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाबाबत एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असून, यामुळे आता थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांना सभागृहात सदस्याप्रमाणे मतदानाचा अधिकार मिळणार आहे. या निर्णयामुळे नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या अध्यक्षांना आता अधिक सक्षमपणे कारभार करता येणार आहे.**



नगर विकास विभागाने मांडलेल्या या प्रस्तावानुसार, आता नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास अधिकृतरीत्या सदस्यत्व मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सध्याच्या नियमानुसार, एखादी व्यक्ती अध्यक्ष आणि सदस्य अशा दोन्ही पदांवर निवडून येण्यास पात्र असते. या नवीन सुधारणेमुळे आता अध्यक्ष म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती आणि सदस्य म्हणून थेट निवडून ▶▶ पान २ वर

# सरपंच संवाद राबवण्यात येणार; मंत्रिमंडळाच्या बैठकीत चार निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने ग्राम, तालुका आणि जिल्हा प्रशासनांसाठी सक्षमीकरण कर्मयोगी २.० आणि सरपंच संवाद कार्यक्रम राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (ता.२४) मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत चार निर्णय घेण्यात आले आहेत.**

यामध्ये धाराशिव जिल्ह्यात साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठेंचा पुतळा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी, १ एकर जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. तर राज्यातील २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४९.०० क्विंटल | २,२०० | २,९०० | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,८०० | ३,००५ | २,६९३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २.०० क्विंटल | ६,२०१ | ६,२०१ | ६,२०१ |
| उडीद : ९.५० क्विंटल | ४,६०० | ४,८०० | ४,७०० |
| बाजरी: ३७.०० क्विंटल | १,८७० | ३,३४० | २,७२७ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,३०१ | ६,३०१ | ६,३०१ |
| सोयाबीन: १३०.५० क्विंटल | ४,४५० | ४,७०० | ४,५६९ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

# आता मधुमेह रुग्णांना श्वासाद्वारे मिळणार इन्सुलिन!

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**सिपला कंपनीने डायबिटीजच्या रुग्णांसाठी इन्हेल (श्वासाद्वारे घेण्यात येणारी) इन्सुलिन अफ्रेजा लॉंच करण्याची घोषणा केली आहे. या इन्सुलिनला गेल्या वर्षी केंद्रीय औषधी मापदंड नियंत्रण संघटनने (सीडीएससीओ) अफ्रेजाच्या वितरण आणि विपणनासाठी मंजुरी दिली आहे. ही इन्सुलिन श्वासाद्वारे घेतली जाणार आहे. त्यामुळे आगामी काळात इंजेक्शनद्वारे इन्सुलिनपासून कायमची मुक्तता मिळणार आहे.**




भारतात १० कोटीहून जास्त लोक डायबिटीज म्हणजे मधुमेहाचे रुग्ण आहेत. ज्यात १० लाख लोक टाईप–१ डायबिटीचे शिकार आहेत. ज्यांना सर्वात जास्त इन्सुलिनची गरज पडते. टाईप–१ डायबिटीजने पीडित लोकांसह टाईप–२ डायबिटीजच्या लोकांनाही इन्सुलिनची गरज असते. डायबिटीजचे रुग्ण देशात जास्त आहेत. हा चिंतेचा विषय आहे. टाईप–१ डायबिटीज पीडित लोकांना इन्सुलिनची सर्वात जास्त गरज असते. इन्सुलिनचा वापर डायबिटीज रुग्णांची ब्लड शुगर लेव्हल कंट्रोल करण्यासाठी केला जातो. शिपला या प्रख्यात औषध कंपनीने इन्हेल्ड इन्सुलिन बाजारात आणण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे इंजेक्शन टोचण्याच्या वेदनेतून सुटका होणार असून श्वासातून ते आता घेता येणार आहे. शिपला ही औषध निर्मिती कंपनी भारतात डायबिटीज रुग्णांसाठी नवीन उपचार प्रणाली आणत आहे. आतापर्यंत इन्सुलिनची गरज असलेल्या रुग्णांना इंजेक्शनद्वारे ते दिले ▶▶ पान २ वर

### या कंपनीला मिळाली मंजुरी

कंपनीने आता त्यांना रॅपिड एक्टिंग इन्हेल्ड इन्सुलिन पावडरीला मंजुरी मिळाली आहे. सरकारी औषध संस्था सेंट्रल ड्रग्ज स्टॅंडर्ड कंट्रोल ऑर्गनायजेशनकडून (सीडीएससीओ) ही मंजुरी मिळाली. लवकरच नव्या प्रकारच्या इन्सुलीनला भारताच्या बाजारपेठेत उतरवले जाणार आहे. त्यांना या औषधांची जाहिरात करण्याची परवानगीही मिळाली आहे. कंपनीच्या मते हे पावडर इन्सुलिन डायबिटीज रुग्णांसाठी अधिक परिणाम कारक आहे.

### आफ्रेजा नावाची पावडर

अफ्रेजा नावाच्या रॅपिड एक्टिंग इन्हेल्ड इन्सुलीन पावडर एक खास सिंगल उपयोग कार्ट्रीजमधून एका छोट्या इन्हेलरच्या माध्यमातून वापरता येणार आहे. डॉक्टरने सांगितलेल्या प्रमाणानुसार आपला डोस इन्हेलरला लावून थेट श्वासाद्वारे हे औषध शरीरात जाऊ शकते. शिपलाचे ग्लोबल चीफ डायरेक्टरच्या मते या नव्या इन्सुलिनद्वारे लोकांना रोज आता इंजेक्शनच्या सुईची वेदना सहन करण्याची गरज राहणार नाही.

cmyk

## अग्रलेख

# एकत्र आलात मात्र टिकून राहा !

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र येत असल्याचे वातावरण आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी दोन ठाकरेंनी युती केली असून, जागावाटप अंतिम झाले आहे. २० वर्षांनंतर हे ठाकरे कुटुंब एकत्र येत असल्याचे दिसते, ज्याची घोषणा २४ डिसेंबरला करण्यात आली आहे. हे मुंबईच्या राजकारणासाठी मोठे पाऊल आहे, ज्यामुळे महाविकास आघाडीला बळ मिळेल. शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांच्या एकसारख्या कृतींमध्ये इतिहास दडलेला आहे. २०१९ मध्ये भाजप-शिवसेना युती तुटली, त्यानंतर राष्ट्रवादीमध्येही फूट पडली. शरद पवार आणि अजित पवार यांच्या गटात विभागणी झाली. २014 मध्ये जेव्हा भाजपने शिवसेनेची युती तोडली तेव्हा राष्ट्रवादीने देखील काँग्रेसची आघाडी तोडून स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. त्यानंतर शिवसेनेच्या आधी राष्ट्रवादीने भाजपच्या सत्तेला पाठिंबा देऊन शिवसेनेची बार्गेनिंग पॉवर कमी करून टाकली होती. यापूर्वी १९८६ मध्ये शरद पवार यांनी राजीव गांधी यांच्या उपस्थितीत संभाजीनगर (औरंगाबाद) येथे काँग्रेस प्रवेश केला होता. त्यानंतर स्थानिक गट शिवसेनेकडे झुकला, ज्यामुळे मराठवाड्यात रुजायला शिवसेनेला फायदा झाला. आज ४० वर्षांनी तिथली सेनेची मुळे कमकुवत झाली आहेत. भाजप विस्तारला आहे. ठाकरे आणि पवार यांच्या राजकारणातील एकमेकांच्या कृतींमुळे अनेकदा भाजपला अप्रत्यक्ष फायदा होतो. तरीही सध्या मराठी माणसांमध्ये ठाकरे बंधू एकत्र येण्याचा उत्साह निर्माण झाला आहे. अलीकडेच एका मेळाव्याच्या, नंतर मोर्चाच्या संयुक्त कार्यक्रमात ते दिसले, नंतर ठाकरे बंधूंनी एकत्र येऊन बाळासाहेब ठाकरेंना श्रद्धांजली वाहिली. तेव्हा अनेकांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. प्रादेशिक पक्षांवर स्थानिक जनतेचे प्रेम असे वारंवार दिसत असते. आता हे दोन बंधू एकत्र आले आहेत मात्र त्यांनी ही युती टिकून ठेवावी अशीच अपेक्षा सबंध महाराष्ट्राची आहे.

पवार कुटुंबातील मनोमिलनाचा समारंभही पुणे, मुंबई आणि ग्रामीण महाराष्ट्रातील राजकीय वातावरण बदलू शकतो. मुंबईत ठाकरेंच्या युतीमुळे भाजपला आव्हान मिळेल, तर पवारांच्या एकत्र येण्याने राष्ट्रवादी मजबूत होईल, ज्यामुळे मराठी मतदार एकगठ्ठा होऊ शकतो. मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरेंची युती मराठी मतदारांच्या जोरावर भाजपला रोखू शकते, शिवाय पवारांच्या एकत्र येण्याने बारामती ते मुंबईपर्यंत राष्ट्रवादीचा प्रभाव वाढेल. पण ते एकत्र येत असतील तर जुन्या चुका सुधारल्याही पाहिजेत. अजित पवारांनी २०२३ मध्ये पक्ष फोडला, ज्यामुळे राष्ट्रवादी कमकुवत झाली. हे टाळण्यासाठी पारदर्शक निर्णयप्रक्रिया हवी. दुसरे मराठी माणसाचे हित साधण्यासाठी टोकाला जाणे या पक्षांनी सुरू केले पाहिजे. आपण मूळची प्रादेशिक शक्ती आहोत, इथे सक्षम असलो तरच राष्ट्रीय राजकारणात आपल्याला महत्त्व आहे हे लक्षात ठेवून त्यांनी सर्वप्रथम देशाच्या आर्थिक राजधानीत काम करणे अपेक्षित आहे. नव्या मुंबईत मराठी भाषा आणि रोजगारासाठी ठाकरेंनी लढा दिला, तर राज ठाकरेंनी उत्तर भारतीयांना लक्ष्य केले, ज्यामुळे पक्षाला तोटा झाला. पवारांनीही कृषी आणि ग्रामीण विकासावर भर दिला, पण शहरी मराठी मतदारांना दुर्लक्षित केले. आता त्यांनी एकत्र येऊन मराठी हितासाठी एकजूट दाखवावी, पण हिंसक राजकारण टाळावे. या मनोमिलनाच्या काळात शरद पवारांच्या निवृत्तीची घोषणा होईल का? हा खरा प्रश्न आहे. २०२४ मध्ये पवारांनी राज्यसभा मुदतीनंतर निवृत्तीचे संकेत दिले होते. २०२५ मध्येही चर्चा आहे, पण ठोस घोषणा नाही. पवार भाऊ-बहिण एकत्र येत असतील तर शरद पवार निवृत्त होऊ शकतात. सुप्रिया सुळे आणि रोहित पवारसह दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले तर त्यांच्या नेत्यांचे धोरण कसे असेल? तज्ज्ञांच्या मते, ही वैचारिक लढाई नाही, तर कौटुंबिक आहे. अजित पवार भाजपसोबत आहेत, पण एकत्र येण्याच्या चर्चा आहेत. नेमके कोणाच्या धोरणात बदल होईल? हा कळीचा प्रश्न आहे. शरद पवारांचा महाविकास आघाडी मजबूत करण्यावर भर असेल. भाजपला विरोध करताना पक्षातील नेते, जसे प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे, यांना समाविष्ट करण्यासाठी विश्वास निर्माण करावा लागेल. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर महाराष्ट्राचे राजकारण खंडित झाले. ठाकरे-पवारांच्या स्पर्धेमुळे १९८० पासून भाजपला फायदा होत आला. असो, आज मराठी मतदारांमध्ये उत्साह आहे, पण हे एकत्र येणे टिकेल का? पवार कुटुंब एकत्र येणे मुंबईत राजकारणाला नवे रूप देईल. हे एकत्र येणे सकारात्मक आहे. महाराष्ट्राला मजबूत विरोधी पक्ष हवा, ज्यामुळे लोकशाही बळकट होईल. पण भूतकाळातील विश्वासघात विसरता येणार नाहीत. ठाकरे आणि पवारांनी मराठी हितासाठी एकत्र यावे, पण वैयक्तिक महत्वाकांक्षांना बाजूला ठेवावे. शरद पवारांनी निवृत्त होऊन नव्या नेत्यांना पुढे आणावे, जेणेकरून पक्ष टिकेल. एकत्र येण्याने मुंबईत भाजपला आव्हान मिळेल, पण हे केवळ निवडणुकीपुरते नसावे. मराठी माणसाचे हित साधण्यासाठी विकास, रोजगार आणि भाषा, संस्कृती टिकण्यावर भर द्यावा. हे मनोमिलन महाराष्ट्राच्या राजकारणाला नवे वळण देईल, पण ते टिकवण्यासाठीही प्रामाणिक प्रयत्न हवेत.

# माळीवाडा बसस्थानकात मंगळसूत्र चोरणारी आरोपी पकडले

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**माळीवाडा बसस्टँड परिसरात गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी करणाऱ्या महिलेचा कोतवाली पोलिसांनी अवघ्या २४ तासात शोध घेऊन तिला जेरबंद केले आहे.दि.२४/१२/२०२५ रोजी सकाळी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. संभाजी गायकवाड यांनी पोलीस स्टेशन हद्दीतील मोटारसायकल चोरी तसेच माळीवाडा परिसरातील सोनसाखळी चोरीच्या घटनांची माहिती घेता गुन्हे शोध पथकातील अधिकारी प्रवीण पाटील व अमलदार यांना आवश्यक आदेश दिले.कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीतील माळीवाडा बसस्टँड परिसरात झालेल्या सोनसाखळी चोरीबाबत गोपनीय बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे श्रीरामपूर येथे शोध घेतला.**

शोधदरम्यान श्रीरामपूर शहरात माहिती काढून आरोपीच्या घराजवळ सापळा लावून पथकाने संशयित महिला रेखा मधुकर आहेर (वय ४० वर्षे,रा.श्रीरामपूर ता.श्रीरामपूर जि.अहिल्यानगर,) हिला ताब्यात घेतले.पो.कॉ.रोहिणी दरंदले यांनी ताब्यात घेऊन आरोपीची सखोल व बारकाईने चौकशी केली असता आरोपीने ''मी माळीवाडा स्टँड परिसरात येणाऱ्या-जाणाऱ्या महिलांचे सोन्याचे दागिने चोरी केले आहेत.तसेच मी चोरी केलेले मंगळसूत्र माझ्याच घरातून काढून देते'' अशी कबुली दिली.त्यानुसार आरोपीने चोरी केलेले खालील नमूद वर्णनाचे मंगळसूत्र तिच्या ताब्यातून काढून दिले. त्यानंतर तिला कोतवाली पोलीस ठाण्यात आणून तपासी अमलदार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. सदर गुन्ह्याबाबत पंचनामा ई साक्ष ॲपद्वारे पंचनामा करून कोतवाली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. ११५९/२०२५, बीएनएस २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो.हवा. १६२० संदीप पितळे हे करीत आहेत.सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री.सोमनाथ घार्गे,अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे,उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.दिलीप टिपरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि.संभाजी गायकवाड व गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, पो.कॉ.बाळकृष्ण दोंड,साबीर शेख,विशाल दळवी,विनोद बोरगे, संदीप पितळे,म.पो.कॉ.दरंदले, पोना.अविनाश वाकचौरे,विजय ठोंबरे,पो.कॉ.दीपक रोहकले, सत्यम शिंदे,सूरज कदम,अभय कदम,शिरीष तरटे,अतुल कोतकर,अमोल गाडे,सचिन लोळगे,राम हंडाळ,संकेत धीवर,अतुल शेंडे,अतुल लाटे तसेच मोबाईल सेलचे पो.कॉ. राहुल गुंडू यांच्या पथकाने केली आहे.

## ज्येष्ठ नागरिक बन्सी ढोकणे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



बीड मधील प्रसिद्ध मेडिकल उद्योजक बाळासाहेब ढोकणे यांचे वडील तथा बीड तालुक्यातील देवी बाबुळगाव येथील ज्येष्ठ नागरिक बन्सी हरिबा ढोकणे (वय ८०) यांचे काल बुधवार दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. ते वैद्यकीय उद्योगातील बाळासाहेब ढोकणे यांचे वडील होते.

बीड मधील प्रसिद्ध मेडिकल उद्योजक बाळासाहेब ढोकणे यांचे वडील तथा बीड तालुक्यातील देवी बाभूळगाव येथील रहिवासी असलेले जेष्ठ नागरिक बन्सी हरिबा ढोकणे हे शांत संयमी आणि मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या मनावर साधूसंत आणि फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी आपल्या मुलांना आणि मुलींना शिक्षण देऊन शिक्षित केले होते. वृद्धापकाळाने मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. मागील काही दिवसांपासून त्यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांना उपचारासाठी बीड शहरातील खासगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असतानाच बुधवार दिनांक २३ रोजी संध्याकाळी ९:३० वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर बुधवार दि. २४ डिसेंबर रोजी दुपारी ठीक १२ वाजता देवी बाबुळगाव येथील त्यांच्या शेतात शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. बन्सी ढोकणे यांच्या पश्चात पत्नी, चार भाऊ, भाऊजयी, दोन मुले, चार मुली, जावई, नातवंडे व पणतवंडे असा मोठा परिवार आहे. आज सकाळी ८ वाजता रक्षा सासवडचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर दुपारी १२ वाजता त्यांच्या देवी बाभूळगाव येथील राहत्या घरी पुण्यनुमोदनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यांच्या निधनाने देवी बाबुळगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ढोकणे परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक राज्यलोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# आष्टीतील राष्ट्रीयीकृत बँकेत 'इन्शुरन्सशिवाय कर्ज नाही'चा फंडा

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी येथील एका राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये मॅनेजरकडून सुरू असलेला मनमानी, ग्राहकविरोधी व संशयास्पद आर्थिक कारभार चव्हाट्यावर आला असून, या प्रकारामुळे सामान्य नागरिक अक्षरशः वेठीस धरले गेले आहेत. बँकेचे मॅनेजर श्री. गोडबोले यांची तात्काळ बदली करून चौकशी करावी, अशी ठोस आणि आक्रमक मागणी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने केली आहे.**

संघाने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेल्या निवेदनात गंभीर आरोप केले आहेत. त्यानुसार,सि एम ई जी पी व विविध योजनांतून कर्ज मंजुरीसाठी बेकायदेशीर अट घालण्यात येत असून, ''बँकेकडून हेल्थ इन्शुरन्स काढल्याशिवाय कर्ज फाइल पुढे सरकणार नाही'' असा अलिखित नियम राबवला जात आहे. ही सक्ती झाल्यानंतरही कर्जदारांची फाइल बीड येथील आरएसी विभागात मुद्दाम त्रुटी काढून अडवली जाते किंवा परत पाठवली जाते. या बेकायदेशीर फंड्यामुळे कर्जदारांची फसवणूक होत असून, दोन ते तीन महिने कर्ज प्रक्रिया रखडते. वारंवार बँकेच्या फेऱ्या, अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे आणि आर्थिक तणाव यामुळे ग्राहक हतबल झाले आहेत. सरकारी बँकेत अशा प्रकारचा कारभार सुरू असणे ही गंभीर बाब असून, बँकेच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. हा प्रकार म्हणजे थेट अधिकाराचा गैरवापर आहे. ग्राहकांची लूट, कर्मचाऱ्यांवर दबाव आणि अप्रत्यक्ष भ्रष्टाचाराला संरक्षण देणारा हा कारभार आहे. अशा अधिकाऱ्यांना तात्काळ हटवले नाही, तर तीव्र आंदोलन करण्यात येईल,'' असा इशारा त्यांनी दिला. संघाने बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापनासह सर्व प्रशासकीय यंत्रणांना निवेदन देत मॅनेजरची तात्काळ बदली, आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी आणि ग्राहकांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास थांबवण्याची ठाम मागणी केली आहे. या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष झाल्यास जनआंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीची धुरा खा. बजरंग सोनवणे यांच्या खांद्यावर

**पुणे । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांनी आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने संघटनात्मक तयारीला गती देण्यास सुरुवात केली असून, त्याचाच भाग म्हणून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या 'निवडणूक प्रभारी'पदी खासदार बजरंग सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने जाहीर करण्यात आली.**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, शहर व परिसरात पक्ष संघटना अधिक सक्षम करण्याची जबाबदारी खासदार सोनवणे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक तसेच विविध सामाजिक घटकांशी समन्वय साधत प्रभावी निवडणूक रणनीती राबविण्याचे



आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना खासदार बजरंग सोनवणे यांनी पक्षाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल समाधान व्यक्त केले. पक्षाचे राष्ट्रीय नेतृत्व, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तसेच सर्व ज्येष्ठ नेत्यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. पक्षाची विचारधारा, धोरणे आणि संघटन अधिक बळकट करत कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार आहे. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला यश मिळवून देण्यासाठी पूर्ण निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करणार आहे, असे सोनवणे यांनी सांगितले. दरम्यान, या नियुक्तीमुळे छत्रपती संभाजीनगर शहरातील राजकीय हालचालींना वेग येणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आगामी निवडणुकांसाठी सज्ज झाल्याचे संकेत मिळत आहेत. संघटन मजबूत करणे, बूथनिहाय तयारी, मतदारांशी संवाद आणि स्थानिक प्रश्नांवर आधारित प्रचार यावर भर देण्यात येणार असल्याचे पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. खा.बजरंग सोनवणे यांना निवडणुकीचा मोठा अनुभव असल्याने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# मानसिक ताणतणाव कसा रोखता येईल-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**मित्रांनो, हल्लीचे जग खूप धावपळीचे झालेले आहे. आपण सगळे फक्त घड्याळाच्या काट्यावर धावतो. या धावपळीत आपल्याला स्वतःसाठी वेळच नाही. परिणामी मानसिक तणावाला सामोरे जावे लागते. हा मानसिक तणाव नकळतपणे आपली लक्षणे दाखवू लागतो.**

सुरुवातीला आपण त्याकडे दुर्लक्ष करतो आणि तसेच दुखणे अंगावरत काढतो. परंतु हाच साधासुधा वाटणारा ताणतणाव नंतर मात्र हळूहळू नैराश्याच्या स्वरूपात आपले भयानक स्वरूप दाखवू लागतो. हे सर्व वेळीच रोखण्यासाठी दिसत असणारी सर्व लक्षणे नीट अभ्यासणे गरजेचे आहे. तरच या सगळ्याचा यशस्वीरीत्या सामना करून तणावाला मात देता येईल. काय आहेत मानसिक तणावाची शारीरिक लक्षणे? तोंडाला चव न लागणे, भूक न लागणे., विनाकारण मळमळ, उलटी आल्याची भावना होणे., डोके गरगरल्यासारखे वाटणे, चालताना हलकासा तोल गेल्यासारखे वाटणे, डोके सुन्न होणे., झोप न लागणे आणि झोप लागली तरी सतत झोपमोड होणे., हातपाय थरथरणे., पोटात अचानक कळ/ गोळा येणे, मलावरोध होणे., वारंवार लघवीला आल्यासारखे वाटणे., त्वचा रुक्ष आणि कोरडी होणे., अंगाला खाज सुटणे., चेहरा निस्तेज होणे, डोळ्याखाली काळी वर्तुळे येणे., केस गळणे., अचानक वजन वाढणे किंवा कमी होणे., अचानक डोळ्यावर अंधारी येणे, डोळे कोरडे होणे. सतत तोंड येणे. मानसिक लक्षणे विनाकारण अस्वस्थ वाटणे. अनामिक भीती वाटणे., काहीही करावेसे न वाटणे., नुसतेच झोपून राहावे, एकाजागी बसून राहावे असे वाटणे., भीती वाटून अंगाला सतत घाम सुटणे., घशाला कोरड पडणे. साध्यासुध्या गोष्टी लक्षात न राहणे., एखादी गोष्ट आठवण्यासाठी मेंदूला खूप ताण द्यावा लागणे., भावना अनावर होऊन अचानक रडू येणे, सतत दुःखी राहणे, शून्यात नजर लावून बसणे., चित्रविचित्र आणि वाईट स्वप्ने पडणे., काळवेळेचे भान न राहणे., धाप लागल्यासारखे होणे, हृदयात धडधडल्यासारखे होणे, कानातून आवाज येणे. अतिचिंता करणे प्रकर्षाने टाळावे. ज्या त्या



गोष्टी जशा आहेत तशा स्वरूपात स्वीकारून त्यात आनंद निर्माण करावा. कुठल्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहावे. स्वतःचे कुटुंब, मित्रमैत्रिणी यासोबत वेळ घालवावा.

आपण स्वतः एकटे पडणार नाही याची काळजी घ्यावी. स्वतःच्या डोक्यात येणारे वाईट विचार, भिती वेळीच बोलून दाखवावी जेणेकरून ते विचार तिथेच नष्ट होतील व संभाव्य ताणतणाव आणि नैराश्य टाळता येईल. स्वतःमध्ये कमीपणाची भावना निर्माण होऊ देऊ नये. आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहावे. नैराश्य (डिप्रेशन) हा आजार पूर्णपणे वैद्यकीय उपचार घेतल्यानेच बरा होतो आणि त्यासाठी वेळीच डॉक्टरांची मदत ही घ्यावीच लागते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## पान १ वरून...

### २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक

अत्यावश्यक असल्याचे सांगत, ही पद्धत महाराष्ट्रात टिकाऊ आणि सक्षम कृषी व्यवस्था उभारण्यासाठी महत्त्वाची ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. रासायनिक खते आणि संकरित बियाण्यांच्या अतिवापरामुळे मातीची सुपीकता घटली असून शेतकऱ्यांचा खर्च वाढला आहे. नैसर्गिक शेतीमुळे स्थानिक पातळीवर उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून खर्च कमी होतो, मातीचे आरोग्य सुधारते आणि उत्पादनक्षमता वाढते, असा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला आहे. दरम्यान, राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी ऑक्टोबर महिन्यात मुंबईतील राजभवन येथे झालेल्या 'नैसर्गिक शेती' विषयावरील परिषदेत सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक शेती यांतील फरक शेतकरी व तज्ज्ञांनी स्पष्टपणे समजून घेण्याची गरज व्यक्त केली होती.

---------------

### तमाशाच्या फडात

तरूण गंभीररित्या जखमी झाला असून अंबाजोगाई येथील स्वाराती रूग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या तरुणाच्या नातेवाईकांनी पोलिसांत धाव घेतली. मात्र, पोलिसांकडून अद्याप कोणत्याही प्रकारे कारवाई केली गेली नसल्याचे खुद्द उपचार घेत असलेल्या तरुणाने प्रतिकिया दिली आहे. या घटनेचं नेमकं काय कारण आहे? हे अद्याप समोर आलेलं नाही. याप्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याचं सांगण्यात आलं आहे. या प्रकरणात नेमकं कोण पोलिसांवर दबाव टाकत आहेत? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

-------------

### अखेर मनसे-उबाठाच्या युतीची

महाराष्ट्रात आला, तसाच आज मराठी ऐक्याचा हा मंगल कलश उद्धव आणि राज यांच्या रूपाने आला आहे. महाराष्ट्राला केवळ ठाकरेच नेतृत्व देऊ शकतात आणि आजच्या या युतीमुळे मुंबईसह सर्व महापालिकांवर भगवा फडकणे आता निश्चित आहे, असे यावेळी राऊतांनी म्हटले. यावेळी त्यांनी मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच होणार, असे म्हणत महापालिका निवडणुकीचे रणशिंग फुंकले. यानंतर राऊतांनी त्यांचा माईक हा सर्वप्रथम उद्धव ठाकरेंच्या हातात दिला. उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंना बोलण्याचा आग्रह केला. परंतु, राज ठाकरेंनीही तूच बोल असे म्हणत उद्धव ठाकरेंना पहिल्यांदा बोलण्यास सांगितले. त्यानंतर उद्धव ठाकरे म्हणाले की, आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे आणि वडील बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईसाठी रक्त सांडले आहे.

---------------

### राज्यात पुन्हा राजकीय भूकंपाची

बीड असल्याचे बोलले जात आहे सत्तेमध्ये असूनही सत्तेत नसल्यागत अनेक नेते राज्यांमध्ये आहेत ज्यांची ओळख धडाडीचे नेते म्हणून आहेत परंतु सत्ता असतानाही त्याचा फारसा उपयोग होत नसल्याने निर्णय बदलण्याच्या तयारीत राज्यातील काही नेते आहेत विशेषता पुन्हा एकदा भाजप यात किंगमेकर ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तवली जात आहे.

-------------

### किडनी रॅकेट प्रकरणी

अवैध सावकारांच्या कर्जामुळे ते प्रचंड मानसिक तणावात होते. कर्ज फेडण्यासाठी कोणताही मार्ग उरला नसल्याने त्यांनी किडनी विकण्याचा निर्णय घेतला. सोशल मीडियावरून याविषयीची माहिती मिळविली. यातूनच त्यांना 'डॉ. कृष्णा' नावाच्या 'प्रोफाईल'ची ओळख झाली. आरोपीने रोशन यांच्या हतबलतेचा फायदा घेत त्यांना किडनीच्या बदल्यात आठ लाख रुपये देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर विमानाचे तिकिट आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करून रोशन यांना कम्बोडियाला नेण्यात आले.कम्बोडियातील एका खासगी रुग्णालयात रोशन यांची किडनी काढण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर त्यांना ठरलेली रक्कम देण्यासाठी आरोपीने टाळाटाळ सुरू केली. केवळ नावापुरते काही पैसे देण्यात आले आणि त्यांना भारतात परत पाठवण्यात आले. पण, भारतात परतल्यावर एका किडनीवर जगताना रोशन यांची प्रकृती खालावली आणि दुसरीकडे सावकारांचा त्रासही कमी झाला नाही. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी धाडस करून पोलिसांत तक्रार दिली, असेही पोलिस अधीक्षक सुदर्शन म्हणाले. आरोपी कृष्णा याने २०१५ मध्ये एक छोटी कंपनी सुरू केली होती. या व्यवसायात तो अपयशी ठरल्याने कर्जात बुडाला होता. आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी कृष्णा याने कम्बोडिया येथील रुग्णालयात आपली किडनी विकली होती. २०१८ पासून तो त्या रुग्णालयाच्या संपर्कात होता. आतापर्यंत १० ते १२ लोकांना किडनी काढण्यासाठी त्याने कम्बोडिया येथे नेल्याची माहिती पोलिस तपासातून उघडकीस आली आहे.

-----------------

### सरपंच संवाद राबवण्यात येणार;

आहे. ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर विकासाभिमुख कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यात जिल्हा कर्मयोगी कार्यक्रम २.० व राज्यातील सरपंचांच्या क्षमता विकसित करण्यासाठी सरपंच संवाद कार्यक्रम राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. हे दोन्ही कार्यक्रम मित्रा संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येतील. जिल्हा कर्मयोगी २.० कार्यक्रम गाव, तालुका व जिल्हा अशा स्तरांवर राबविण्यात येईल. यामध्ये सेवा देणाऱ्या थेट संबंधित अधिकाऱ्यांपासून ते स्थानिक प्रशासनातील शेवटच्या टप्प्यातील अधिकारी, कर्मचारी यांचे कौशल्य वाढविण्यात येणार आहे. यातून जिल्ह्याचा जीडीपी वाढविण्याकरिता सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग औद्योगिक युनिट्स, तसेच शेतकरी उत्पादक संघटना -एफपीओज्? यांसारख्या कृषी संबंधित आर्थिक घटकांना भेडसावणाऱ्या समस्या दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. जिल्हा स्तरावर शासन-ते-व्यवसाय सेवा सुधारणेवर भर दिला जाईल. विविध विभागांमधील सहकार्य वाढवून डेटा संकलन, समन्वय आणि निर्णय प्रक्रियेमधील सहभागाला प्रोत्साहन दिले जाईल. थेट लोकांमध्ये जाऊन काम करणारे अधिकारी कृषी अधिकारी, कनिष्ठ अभियंता व कार्यकारी अभियंता, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी, सिंचन कालवा निरीक्षक, जिल्हा व सहाय्यक सांख्यिकी अधिकारी तसेच सांख्यिकी निरीक्षक व अन्वेषक इत्यादींचे सक्षमीकरण केले जाईल. राज्यातील सुमारे ८५ हजार अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. सरपंच संवाद कार्यक्रमासाठी भारतीय गुणवत्ता परिषद (क्यूसीआय) मित्रा आणि व्हीएसटीफ फाऊंडेशन यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार राज्यातील सुमारे २० हजार सरपंचांना प्रशिक्षण दिले जाणे अपेक्षित आहे. या प्रशिक्षणात प्रामुख्याने आर्थिक स्वायत्तता व संसाधन, शासन योजना राबविणे, ग्रामपंचायतींना सक्षम करण्यासाठीचे दूरगामी नियोजन, महिला सदस्यांचे सक्षमीकरण, अंमलबजावणीतील त्रुटी शोधणे व त्यावर मात करणे, तसेच विविध गटांसाठी समावेशक व सुसंगत प्रशिक्षणाचा समावेश असेल. तज्ज्ञांद्वारे तसेच ई-लर्निंग, वेबिनार, इन-ॲप प्रशिक्षण, आभासी सत्रे आणि कार्यशाळा या माध्यमांतून हे प्रशिक्षण दिले जाईल.

-----------------

### थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांना

आलेली व्यक्ती एकाच वेळी दोन्ही पदे धारण करू शकणार आहे. जनतेतून थेट निवडून आलेल्या अध्यक्षाला लोकशाहीत मिळालेला जनादेश विचारात घेऊन त्याला सभागृहाच्या कामकाजात मतदानाचा पूर्ण अधिकार देण्यात आला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे अध्यक्षांना आता सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार प्राप्त होईल. विशेष म्हणजे, सभागृहात एखाद्या विषयावर मतदान प्रक्रिया पार पडताना जर मतांची बरोबरी झाली, तर अध्यक्षांना त्यांचे 'निर्णायक मत' देण्याचा विशेष अधिकार देखील कायम राहणार आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्णया प्रक्रियेत अध्यक्षांचे स्थान अधिक मजबूत होणार असून विकासकामांना गती मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

-------------

### मंत्री राणेंसह तीघा

कुडाळ पोलीस स्थानकात त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता.सिंधुदुर्गात राजन तेली यांच्यासह आमदार निलेश राणे, मंत्री नितेश राणे यांच्यासह अन्य ४२ जणांवर आंदोलन प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. त्याप्रकरणी, न्यायालयात आज झालेल्या सुनावणीस आमदार निलेश राणे आणि राजन तेली तसेच अन्य आरोपी उपस्थित होते. मात्र, नितेश राणे यांच्यासह अन्य ५ जण गैरहजर होते. मंत्री नितेश राणे वारंवार न्यायालयाच्या तारखांना गैरहजर राहिल्याने न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केले आहे. दरम्यान, न्यायालयाने अनुपस्थित राहिलेल्या नितेश राणे यांच्या वकिलांचा विनंती अर्ज नाकारला आहे. त्यामुळे, मंत्री महोदयांना कोर्टाकडून दणका देण्यात आला आहे.

----------------

### आता मधुमेह रुग्णांना श्वासाद्वारे

जात होते. परंतु आता या कंपनीने त्यात बदल करून 'अफ्रेजा' नावाची रॅपिड एक्टिंग इन्हेल्ड इन्सुलिन पावडरीला भारतीय मार्केटमध्ये उतरवण्याची घोषणा केली. यामुळे इंजेक्शनच्या सुईतून इन्सुलिन घेण्याची कटकट संपणार आहे. डायबिटीजचे रुग्ण आता इन्सुलिन पावडरला इन्हेल करून श्वासातून आपल्या शरीरात हे औषध शोषू शकणार आहेत.

---------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. २५ डिसेंबर २०२५


## थोडक्यात



### नर्सिंग कॉलेज जिल्हा रुग्णालय बीड येथे जागतिक ध्यान दिन साजरा

बीड । प्रतिनिधी


दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम व आयुष विभाग, जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ध्यान दिन नर्सिंग कॉलेज, जिल्हा रुग्णालय बीड येथे साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. डॉ. सतीशकुमार सोळंके (जिल्हा शल्यचिकित्सक, बीड) हे उपस्थित होते. तसेच डॉ. संजय राजूत (वैद्यकीय अधिकारी), डॉ. सुवर्णा बेद्रे (प्राचार्य, नर्सिंग कॉलेज), डॉ. आनंद कुलकर्णी (आयुष विभाग), डॉ. अशोक मते, नागनाथ भडकंबे, अंबादास जाधव तसेच परिचर्या प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. सतीशकुमार सोळंके यांनी मानसिक शांतता, तणावमुक्त जीवनशैली याबाबत सविस्तर माहिती दिली. ध्यानाचे शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम त्यांनी स्पष्ट केले. परिचर्या प्रशिक्षणार्थींनी भविष्यात रुग्णसेवा करताना स्वतःचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी मेडिटेशन (ध्यान) करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ध्यानामुळे तणाव कमी होतो, कार्यक्षमता वाढते व आरोग्यदायी जीवनशैली निर्माण होते, असा संदेश यावेळी देण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

### डॉ.सानप यांना गंगाई-बाबाजी पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

जवळपास ३५ वर्षापासुन सामाजिक, राजकीय, क्षेत्रातील कार्या सोबत ग्रंथालय चळवळीत स्वतःला वाहून घेणारे. बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष व सध्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक व खा शरदचंद्र पवार साहेब यांच्या हस्ते राज्य स्तरीय ग्रंथ मित्र पुरस्काराने सन्मानित असलेले डॉ राजेंद्र सानप यांना सन २०२५-२०२६ चा राज्य स्तरीय गंगाई-बाबाजी आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



बीड जिल्हात शासनाच्या गाव तिथे ग्रंथालय!या धोरणानुसार गावा गावात ग्रंथालय चळवळ उभारावी यासाठी ३५वर्षापासुन सक्रीय सहभाग घेणारे सार्व. ग्रंथालयाच्या विविध प्रलंबित प्रश्नावर जन आंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष करणारे राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात सतत कार्यरत असणारे,पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाटचे माजी सरपंच राहिलेले बीड शहरात इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे श्रीसंत भगवानबाबा,श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठानच्या माध्यमातून, भाऊ -बाबांचे,व विठ्ठल रखुमाई,व हनुमान मंदिर असे २मंदीर स्वखर्चाने उभारून प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध प्रकारचे उपक्रम राबवले, सुमारे ३१२किर्तनाचे १३सप्ताहाचे संतांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजन करून विविध विषयांवर अनेक कार्यक्रमाचे आयोजन करतात. सावरगाव घाट व बीड येथे इंद्रप्रस्थ कॉलनी मंदिर परिसरात भगवान महाराज सार्व वाचनालय ११५००ग्रंथ संपदा व सुस्सज इमारत वाचकांना ज्ञान वाढीसाठी सुविधा देण्याचे कार्य डॉ सानप यांच्या माध्यमातून करत आहे. अशा या समाजसेवक डॉ राजेंद्र सानप यांना सन २०२५-२०२६ चा राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी आदर्श पुरस्काराने दि १जानेवारी २०२६ रोजी आष्टी येथे मा.आ भिमराव धोंडे व मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल डॉ राजेंद्र सानप यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# शासकीय योजनांचा लाभ दिव्यांग व्यक्तींना वेळेत मिळवून द्या- जिल्हाधिकारी जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

शासकीय योजनांचा लाभ दिव्यांग व्यक्तींना वेळेत आणि प्रभावीपणे मिळवून द्या असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले. जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालय येथे सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेण्यात आली. दिव्यांग कल्याणच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच दिव्यांग व्यक्ती व अधिकार अधिनियम २०१६ नुसार कार्यवाही सुनिश्चित करण्याच्या दृष्टिकोनातून या बैठकीत चर्चा करण्यात आली यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत दिव्यांगांसाठी सर्व शासकीय इमारती, संकेतस्थळे व सार्वजनिक सुविधा सुलभ (-ललर्शीीळलश्रश) करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. तसेच शासकीय आस्थापनांमध्ये दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे लाभ घेणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना UDID प्रणालीशी संलग्न करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी सर्व उपविभागीय अधिकारी व संबंधित तहसीलदारांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्हा शल्यचिकित्सक व अधिष्ठाता, स्वामी




रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांना दिव्यांग प्रमाणपत्र वाटप व णऊखऊकार्ड उपलब्ध करून देण्याबाबत तत्काळ कार्यवाहीचे आदेश देण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांग कल्याणासाठी राखीव ५ टक्के निधी नियोजनबद्ध पद्धतीने खर्च करावा तसेच सर्व पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळेल याची दक्षता घ्यावी, असे निर्देश गटविकास अधिकारी व नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले. दरम्यान, जिल्हा परिषद अंतर्गत शालेय शिक्षण विभागात शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी णऊखऊ कार्ड काढण्याकरिता विशेष मोहिम राबविण्यात येणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिली.

अनुषंगाने सर्व विभाग प्रमुखांनी उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. शासन निर्णयानुसार सर्व ५% निधी दिव्यांगांच्या विविध योजनांवर खर्च करण्याचे निर्देश दिले. बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगाशी निगडीत जिल्हा वार्षिक योजनेमधील १% निधी मधून दिव्यांगांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी महोदयांनी सांगितले. शिवाय दिव्यांगांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक हितासाठी जिल्हास्तरावर संयंत्रणा समिती व नियोजन समिती तयार करून प्राधान्याने दिव्यांगांचे प्रश्न सोडविणार असल्याचे नमूद केले. बीड जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातील दिव्यांगांचे सर्वेक्षण जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, बीड यांच्यामार्फत पूर्ण झाले असून उपलब्ध माहितीनुसार प्रत्येक शासकीय विभागाचा कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. सदर आराखड्यानुसार संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर बैठकीसाठी बीड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी, सर्व मुख्याधिकारी, जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे सर्व कर्मचारी, जिल्हा शल्यचिकित्सक, अधिष्ठाता स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई व प्रियाराणी पाटील, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांची उपस्थिती होती.

## वयाच्या ७७ व्या वर्षी मोगरेकर आजीचा गीता लेखन उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

भगवद्गीता हा सर्व अध्यात्माचे मूळ ग्रंथ आहे. हा कोणताही सांप्रदायिक ग्रंथ नाही; हा मानवजातीला ज्ञान देणारा ग्रंथ आहे. हा आपल्या जीवनाच्या कठीण मार्गावरील एक मशाल आहे. कोटी गीता लेखन यज्ञ हा गीता ग्रंथ जास्तीत जास्त घरांपर्यंत पोहोचवण्याच्या दृढ निश्चयाने सुरू केलेला एक पवित्र प्रकल्प आहे.उडुपि येथील पूज्य श्री स्वामीजींनी किमान एक कोटी लोकांनी श्रीमद्? भगवद्गीता स्वतःच्या हातांनी लिहून उडुपी येथील श्रीकृष्णाला अर्पण करावी, असे एक महत्त्वाकांक्षी ध्येय ठेवले आहे.या यज्ञात भक्त नोंदणी करतात,संकल्प करतात आणि त्यानंतर श्री मठाने दिलेल्या पुस्तकात कोणत्याही भाषेत श्रीमद्? भगवद्गीतेचे सर्व ७०० श्लोक किमान एकदा लिहितात.



हा यज्ञ सर्व भक्तांसाठी खुला आहे.लेखन पूर्ण झाल्यावर, भक्त उडुपीला येऊन लिहिलेले पुस्तक श्री स्वामीजींना अर्पण करू शकतात,जे ते पुस्तक उडुपी श्रीकृष्णाला अर्पण करतील आणि तेच पुस्तक श्रीकृष्णाचा प्रसाद म्हणून परत देऊन भक्तांना आशीर्वाद देतील.हे पुस्तक भक्तांच्या घरात ठेवले जाईल आणि त्याची पूजा केली जाईल. त्याची पूजा त्यांची मुले, नातवंडे आणि पणतू करतील. भगवद्गीता त्यांच्या वंशाची प्रेरणा बनेल आणि श्री कृष्ण गीतेच्या



मार्गदर्शनाखाली जीवनाचे ध्येय प्राप्त होईल.सौ.शालन बापुराव कुलकर्णी,मोगरेकर यांनी श्री विनायक जोशी कानसुरकर यांचेकडून या उपक्रमाची माहिती घेतल्यानंतर अतिशय तळमळीने आणि ध्येय प्रेरित होऊन वयाच्या ७७ व्या वर्षी भगवद्गीतेचे सर्वच्या सर्व १८ अध्याय स्वहस्ते लिहून काढून सफला एकादशीच्या मंगल मुहूर्तावर हा उपक्रम पूर्ण केला.

प्रापंचिक सर्व अडचणी दूर ठेवून हा संकल्प पूर्ण केल्यावर त्यांच्या मनात एक समाधानाची आणि आनंदाची भावना निर्माण झाल्याचे त्या सांगतात.त्यांच्या या विशेष उपक्रमानंतर त्यांचे अभिनंदन होत आहे

भगवद्गीता म्हणजे जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन करणारा एक महान ग्रंथ आहे, जो कर्तव्य, निष्काम कर्म (फळाची अपेक्षा न करता काम करणे), आत्मज्ञान, मन आणि इंद्रियांवर नियंत्रण, समत्वभाव आणि आत्मिक शांती यांसारख्या मूल्यांवर भर देतो, जेणेकरून व्यक्ती योग्य मार्गावर चालून यश आणि समाधान मिळवू शकेल

-ह. भ. प. ज्ञानेश महाराज धानोरकर

पान ६ वरुन...

### वडवणीच्या शासकीय

तरी या मध्ये प्रशासनाने गेल्या एक वर्षभरापासून हे अतिक्रमण हटविण्यासाठी तहसील कार्यालयामार्फत संबंधित अतिक्रमणधारकांना नोटीसही दिलेल्या होत्या तसेच न्यायालयामध्येही हा वाद गेल्यानंतर सदर अतिक्रमण काढण्याचे आदेश दिलेले होते यामध्ये काल तहसील महसूल प्रशासनाची संबंधित वडवणी सज्जाचे तलाठी वडमारे हे सदरील अतिक्रमण धारकांना नोटीस देण्यासाठी गेले असता सदरील अतिक्रमणधारकांनी त्यांना आरेरावीची भाषा करून धक्काबुक्की केल्याचा प्रकार घडल्याने प्रशासनामध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती यामध्ये महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी विनोद इंगोले, तहसीलदार वैभव महेंद्रकर व सर्व महसूल अधिकारी कर्मचारी यांनी तात्काळ अतिक्रमण केलेल्या ठिकाणी एकत्र आले व तात्काळ पोलीस बंदोबस्त बोलावुन संबंधित किरायधारकांना आपले सामान काढण्याच्या सूचना दिल्यानंतर संबंधित गाळे किरायधारकांची सामान काढण्यासाठी धावपळ सुरू झाली यामध्ये सायंकाळी सहा वाजल्यापासून पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने सदरील शासकीय जागेतील अतिक्रमण हटविण्यास प्रशासनाने कारवाई सुरू केली असून त्यामुळे वडवणी शहरासह तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. व शहरातील शासकीय जागेवर अतिक्रमण केलेल्या अतिक्रमणधारकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी अतिक्रमण हटविण्यास मोहिमेवेळी कसलाही आणि अनुचित प्रकार घडू नये यासाठी सपोनी वर्षा व्हगाडे मॅडम यांनी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात केला होता

वडवणी शहरातील तहसील परिसरातील शासकीय गट नंबर ६५६ मोजणी करण्यात आलेली होती यामध्ये सदरील काही जणांनी अतिक्रमण केलेले होते तरी सदरील अतिक्रमणामुळे शहराच्या विकास कामांना अडथळा येत होता त्यामुळे गेल्या वर्षभरापासून सदरील अतिक्रमण हटविण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न सुरू केले होते यामध्ये अतिक्रमणधारकांना तीन वेळा नोटीसही देण्यात आल्या होत्या तसेच यामध्ये माननीय न्यायालयाने सदर गटातील अतिक्रमण काढण्याच्या सूचना दिलेल्या होत्या या सर्व सूचनांचे पालन करून सदरील शासकीय जागेतील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू केली आहे तसेच शहरातील तर ठिकाणी असणारे अतिक्रमण काढून घेण्यात यावे रस्ता कारवाई करण्यात येणार आहे :- विनोद इंगोले (उपविभागीय अधिकारी माजलगाव).

### सगळीकडेच तोंड मारणाऱ्या

कार्यकर्ते आपापल्या पद्धतीने भूमिका बदलू लागले. त्यातील राष्ट्रवादीच्या घडीचा प्रचार करणारा एक राव चाबरेपणा करण्यात भलताच पुढे गेला. नगरपालिकेसाठी मतदान झाल्यानंतर त्याची मतमोजणी करण्यास सुमारे वीस दिवसांचा कालावधी लागला. या काळामध्ये निवडून येणाऱ्या नगराध्यक्ष च्या आपण जवळ असावेत या उद्देशाने तोंडमारी करीत सरळ विरोधक असलेल्या भाजपच्या दारी त्याने ठाण मांडले आणि पक्षात असल्याने वरवर काम करणे भाग होते, मात्र आतून ''मी तुमच्याच बाजूने आहे'' असा बनाव त्याने विरोधकांकडे केला.जर भाजपचा उमेदवार निवडून आला असता, तर आपल्याला त्याचा फायदा व्हावा आणि आपण त्यांचेच आहोत, असा ठसा उमटावा यासाठीच ही दुहेरी चाल खेळण्यात आली. म्हणजेच दोन्ही डगरीवर पाय ठेवण्याचा प्रयत्न या फिरस्त्याने केला.

जेव्हा घडीचा उमेदवार नगराध्यक्ष झाला, तेव्हा मात्र या महाशयांनी छातीठोकपणे विजयाचे श्रेय स्वतःकडे घेण्यास सुरुवात केली. मात्र त्याची ही चलाखी आता उघडी पडली असून, जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात त्यांची चर्चा उपहासाने सुरू आहे. चालबाजी उघड झाल्यावर 'फिरस्त्याचे' खरे रूप समोर आले असून, वेळ आल्यावर त्याला त्याच्या कृत्यांचे योग्य बक्षीस मिळेल, अशी जोरदार चर्चा सध्या बीडमध्ये रंगली आहे.

### शासकीय हमीभावाने होणार

त्यामुळे या योजनेचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आवाहनही चेअरमन अतुल आदिनाथ सानप आणि सचिव बबन रोहिदास शेकडे यांनी केले आहे.याबाबत अधिक माहितीसाठी आष्टी तालुका खरेदी-विक्री संघाचे सचिव बबन रोहिदास शेकडे यांचे ७९७२८०२७२७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहनही करण्यात आले आहे

### शुक्रवारी महेश सहकारी

-उत्रख चे कार्य, खख उरीश र्ऋीपवरींळेप चा सहभाग,एकत्रित कामाचे धोरण, शेतकरी हितासाठी राबविण्यात येणारे उपक्रम तसेच शेतकऱ्यांना होणारे आर्थिक व तांत्रिक फायदे याविषयी माहिती दिली जाणार आहे.

कार्यक्रमात स्क्रीनवरून भाग १, भाग २ व भाग ३ असे ऊस व्यवस्थापनावर आधारित व्हिडिओ सादरीकरण होणार आहे. त्यातून शेतकऱ्यांना ऊस शेतीतील आधुनिक पद्धती, प्रात्यक्षिक उदाहरणे व यशस्वी शेतकऱ्यांचे अनुभव दाखविण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष उपयोगी ठरणारी माहिती मिळणार आहे.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित शेतकरी बांधवांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.या भव्य मार्गदर्शनपर कार्यक्रमास महेश सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील व परिसरातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे.

### देव दहिफळ श्री तुळजाभवानी

महारुद्र महाराज पवार, रामेश्वर महाराज गरड, ओमकार महाराज रसवे,एकनाथ महाराज करे, नागेश महाराज व्हरकटे , विठ्ठल महाराज मंत्री श्री संत ज्ञानोबाराया वारकरी शिक्षण संस्था दिंद्रुड विद्यार्थी उपस्थित रहाणार आहेत तरी परीसरातील भावीक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री रामदास लक्ष्मण डांगे यांनी केले आहे.

## प्रितम हुले हिला कुस्तीमध्ये राज्यस्तरीय सिल्वर मेडल, शाळेच्या वतीने सत्कार

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहराच्या जवळ असलेले ढाळेवाडी येथील श्री.शाम हुले यांची मुलगी कु. प्रितमचा ओरस (सिंधुदुर्ग) येथे आयोजित राज्यस्तरीय कुस्तीस्पर्धेमध्ये सिल्वर मिडल मिळाल्या बद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढाळेवाडी यांच्या वतीने आज सत्कार करण्यात आला, यापूर्वी प्रितम ला तालुकास्तरीय जिल्हास्तरीय व विभागीय स्तरीय अनेक पारितोषिक मिळालेले आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे व वक्ते सामाजिक कार्यकर्ते सज्जाद भाई सय्यद यांनी बोलतांना सांगितले की, विद्यार्थ्याला ज्या क्षेत्रामध्ये आवड आहे. ते क्षेत्र निवडावे शिक्षणासह खेळाकडे दुर्लक्ष करू नका. कारण खेळाच्या माध्यमातून सुद्धा आपण उच्च पदाची नोकरी मिळू शकते. पैलवान राहुल आवारे चे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. व पै.कु. प्रितम ला शुभेच्छा दिल्या. कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की प्रितम लवकरात लवकर देशपातळीवर खेळणार आणि पाटोदा तालुक्याचे नाव उज्वल करणार तात्यासाहेब घुले यांनी प्रीतमला भरभरून शुभेच्छा दिल्या गटशिक्षणाधिकारी गव्हाणे सर यांनी सांगितले की प्रीतमचा ऑनलाइन फॉर्म भरण्यापासून ते अनेक अडचणी सोडवण्याचं काम शिक्षण विभागाने व ढाळेवाडी जिल्हा परिषद शाळेने केले. आनंद जाधव यांनी प्रितमला शुभेच्छा दिल्या. यावेळी मंचावर या कार्यक्रमाचे अध्यक्ष पै.आबा आवारे ,गटशिक्षणाधिकारी गव्हाणे सर. राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष आनंद जाधव, बाजार समिती उपसभापती पांडुरंग नागरगोजे, सेवा सोसायटीचे संचालक सज्जाद भाई सय्यद ,मा.सभापती अनिल जायभाय,मराठा सेवक सुरेंद्र बाबा तिपटे, अनिकेत राख, राजपाल शेंडगे, सरपंच रंजीत लांबजे, ग्रामसेवक जगताप सर ,बाप्पा हुले, सखाराम सकुंडे ,बाबा तनपुरे ,मल्हारी सकुंडे ,बदाम भोसले , उमेश कदम बाळू कडबने या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्रीमती टेकाळे मॅडम व सूत्रसंचालन बिनवडे सर, यांनी केले. तसेच शाळेतील शिक्षिका कदम मॅडम, सव्वासे मॅडम, मुसळे सर उपस्थित होते. आलेले सर्वांचे आभार शाम हुले यांनी केले.



## आजच्या शेतकरी पुत्र हक्क मोर्चात मोठ्या संख्येने सामील व्हा -प्रा.बबन आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक २४ १२ २०२५ महाराष्ट्र राज्यातील शेतकरी अत्यंत बिकट परिस्थितीतून जात आहे शेतीमालाच्या उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झालेली असताना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला जसा पाहिजे तसा भाव मिळत नाही त्यामुळे शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झालेला आहे विशेष म्हणजे शेतकऱ्यांचे मुख्य पीक समजले जाणारे कापूस, सोयाबीन, तूर या प्रमुख पिकाचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी प्रमाणात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी शेतकरी हक्क मोर्च्याच्या वतीने गुरुवार दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शेतकरी हक्क मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा काढण्यात येणार आहे या मोर्चामध्ये शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे असणार आहेत १) कापसाला किमान १२ ००० रुपये प्रतिक्विंटल भाव द्यावा २) सोयाबीनला किमान ७००० रुपये प्रति क्विंटल भाव द्यावा ३) कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया (सी.सी.आय.) कडून होणारी फसवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात यावा. ४) हमीभावापेक्षा कमी दाराने शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. ५) मार्केटमध्ये किंवा बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या मालाचा विक्री दर व खरेदी यामधील फरक सरकारने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना भरून द्यावा. ६) शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना सबसिडी, अनुदान, व पिक विमा, यांची थकीत रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. या मागण्याकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी होऊन महाराष्ट्रातील शेतकरी मोठ्या संख्येने एकत्र येऊन तीव्र आंदोलन करतील असा इशाराही यावेळी देण्यात आलेला आहे शेतकरी हक्क मोर्चाला जिल्ह्यातील ११ तालुक्यातून शेतकरी राजा मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती शेतकरी हक्क मोर्च्याच्या आयोजकाने दिलेली आहे. तसेच बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी बीड येथे गुरुवार दिनांक २५ डिसेंबर रोजी मोठ्या संख्येने हजर राहावे असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्ध पत्रकार द्वारे केले आहे.



## वेळ आपल्या बाजूने नसेल, तेव्हा संयम ठेवणं हेच आपले खरे शस्त्र- नाना महाराज कदम

बीड । प्रतिनिधी

श्री शनि जन्मोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त श्री शनी मंदिर देवस्थान, बीड यांच्या वतीने आयोजित भव्य कीर्तन महोत्सवातील दुसरे कीर्तन पुष्प रामायणाचार्य ह.भ.प. श्री नाना महाराज कदम (नेकनूर) यांच्या रसाळ, ओजस्वी व भावपूर्ण कीर्तनाने भक्तिरसात संपन्न झाले. महाराजांच्या प्रभावी वाणीमुळे उपस्थित भाविक भक्तिभावात तल्लीन झाले होते.



कीर्तनाच्या प्रारंभी संत नामदेव महाराजांच्या

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहीन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंदे पूजिन ।
भावे ओवाळीन म्हणे नाम ।।

या सुप्रसिद्ध अभंगाचे सादरीकरण करण्यात आले. या अभंगाच्या भावार्थातून महाराजांनी ईश्वरचरणी संपूर्ण शरणागती, निस्सीम भक्ती, प्रेमभाव व नामस्मरणाचे महत्त्व अत्यंत प्रभावी शब्दांत उलगडून सांगितले. कीर्तनात संत बंकटस्वामी महाराज, संत भगवान बाबा, संत माऊली दादा चाकरवाडी आदी संतांच्या जीवनातील प्रसंगांची उदाहरणे देत महाराजांनी संतसंगतीचे महत्त्व अधोरेखित केले. मानवाचे जीवन संतसंगतीने समृद्ध होते. संत दोष-दुर्गुण दूर करून मानवतेचे शिक्षण देतात. अंतःकरण निर्मळ झाले की देव स्वतः आपल्या घराचा शोध घेत येतो, कारण तोही भक्तांच्या भेटीची वाट पाहत असतो, असा मार्मिक संदेश त्यांनी दिला. कीर्तनातून मार्गदर्शन करताना महाराज म्हणाले की, श्री शनीदेव हे न्यायप्रिय असून भक्तांच्या श्रद्धेवर प्रसन्न होणारे आहेत. जीवनातील अडचणी, संकटे व दुःख दूर करण्यासाठी संयम, सत्कर्म व नामस्मरण अत्यावश्यक आहे. श्रद्धा व नियमपालनातूनच जीवनात स्थैर्य, समाधान व आध्यात्मिक उन्नती साध्य होते. प्रत्येक व्यक्ती आपल्या गुरूंवर ठेवलेल्या श्रद्धेमुळे मोठी होते, असे प्रतिपादन त्यांनी केले. निष्काम सेवेचे महत्त्व विशद करताना महाराज म्हणाले की, निष्काम सेवा असेल तर देव स्वतः पाठीशी उभा राहतो. यावेळी त्यांनी रामनाथ खोड यांच्या सेवाभावी कार्याचा उल्लेख करत, अनेक देवस्थानांच्या जमिनी मिळवून देण्याच्या कार्यामागे देवकृपा व सेवाभाव असल्याचे उदाहरण दिले. आपण आनंदी व प्रसन्न असलो की ईश्वर आपली प्रसन्नता अधिक वाढवतो, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

कीर्तनादरम्यान टाळ-मृदंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष सुरू होता. भाविक भक्तिरसात तल्लीन झाले होते. संपूर्ण मंदिर परिसरात भक्तीमय, शांत व पावन वातावरण नांदत होते.

श्री शनि जन्मोउत्सवानिमित्त सुरू असलेल्या या कीर्तन महोत्सवाला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभत असून दररोज नामवंत कीर्तनकारांची कीर्तने संपन्न होत आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री शनी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी, सेवक व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. भाविकांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

श्री शनि जन्मोउत्सवाच्या निमित्ताने भक्ती, श्रद्धा व संस्कृतीचा संगम अनुभवण्याची संधी भाविकांना मिळत असून संपूर्ण परिसर अध्यात्मिक वातावरणाने भारावून गेला आहे.

### जावेद पठाण यांना गंगाई- बाबाजी पुरस्कार

आष्टी । प्रतिनिधी

पत्रकार जावेद पठाण यांना यंदाचा गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला असून त्यांनी पत्रकार क्षेत्रा केल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



जावेद पठाण हे मागील गेल्या २५ वर्ष पत्रकारिता क्षेत्रांमध्ये कार्यरत असून पत्रकार क्षेत्रामधील पदव्युत्तर पदवी मास्टर ऑफ मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम त्यांनी १९९९ साली पूर्ण केले असून लोकमत समाचार, दैनिक सुराज्य ,संकेत, लोकप्रश्न, दैनिक भास्कर ,आकाशवाणी परभणी या ठिकाणी कार्य करत त्यांनी अनेक सामाजिक व गोरगरीब सर्वसामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम व न्याय मिळवून देण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून करत असून नुकतीच त्यांनी आष्टी तालुक्यातील काकडे ची किन्ही गावालगत चार बिबट्याचे लाईव्ह व्हिडिओ शूट करत आसपासच्या परिसरातील लोकांना तात्काळ माहिती देऊन जनजागृती करत अनेक जीवांचे रक्षण करून लोकांमध्ये माहिती देत जागृती केली होती त्यांचा हा व्हिडिओ ची अख्ख्या महाराष्ट्रात गाजला सोशल मीडियावर तर प्रत्येक ठिकाणी हा व्हिडिओ चर्चिला गेला व त्याची दखल देखील वन विभागाने घेतली होती. त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शेतकरी शिक्षण संस्था संचलित भगवान महाविद्यालय आष्टी येथे आयोजित 'गंगाई बाबाजी महोत्सव' समितीच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यात येत असतात. या वर्षीचा २०२५चा आदर्श पत्रकारिता पुरस्कार जावेद पठाण यांना जाहिर झाला असून लवकरच दि.३१ डिसेंबर रोजी मुख्य अतिथी व माजी.आ. भिमराव धोंडे यांच्या हस्ते वितरण करण्यात येणार आहे.

# मृत माती माणुसकीला जिवंत ठेऊ शकत नाही-अशोक गुलाटी

## २०२६ वर्ष मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारी वर्ष असेल - मयंक गांधी

परळी । प्रतिनिधी

पंजाब आणि हरियाणा येथील लोकांनी केमिकल जमिनीत टाकून माती जाळून टाकली. मातीला आपण माता म्हणतो आणि तिला जिवंत ठेवण्याचे उपाय सोडून सर्वत्र प्रदूषणच प्रदूषण सोडत आहोत. खरोखरच मातृसेवा करायची असेल तर मातीला जिवंत ठेवण्यासाठी काम करावे लागेल. यासाठी सर्वांना एकत्र यावे लागेल, मातीला जिवंत करण्याचा विचार पुढे आणावा लागेल, पुढे न्यावा लागेल. मयंक गांधींनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात उभे केलेले कार्य अतिशय उल्लेखनीय आणि प्रेरणादायी आहे. या कामाला बीड जिल्ह्यातच नाही तर राज्यात आणि संपूर्ण देशात न्यावे लागेल असे प्रतिपादन ज्येष्ठ केंद्रीय कृषी अर्थसल्लागार अशोक गुलाटी यांनी केले. सिरसाळा येथील कृषीकुल येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांच्यासह शक्ती सोलारचे कार्यकारी संचालक प्रकाशचंद्र पाटीदार, मृदा शास्त्रज्ञ सय्यद इस्माईल, सूक्ष्मजीव शास्त्रज्ञ दयानंद आगसकर, ज्येष्ठ फळबाग तज्ज्ञ डॉ.एम.बी.पाटील, डॉ.हरिश्चंद्र वंगे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी म्हणाले की, अशोक गुलाटी यांच्यासारख्या ऋषितुल्य व्यक्तिमत्वांची देशाला गरज आहे. भारताच्या कृषी क्षेत्रात आर्थिक क्रांती आणण्याच्या दृष्टीने त्यांचे विचार आणि ज्ञानाचा नक्कीच भविष्यकालीन दूरगामी परिणाम होऊ शकतो. मराठवाड्यात आणि विशेषतः बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रोत्सान देण्यासाठी सर्व स्तरावरील शक्य तेवढे प्रयत्न केले जात असून जिल्हा प्रशासन आणि ग्लोबल विकास ट्रस्ट मिळून समन्वय करत केला जात आहे. ज्याच्या माध्यमातून फळबाग लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आवश्यक पायाभूत सुविधा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचबरोबर कृषीकुल येथे शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देऊन उत्तमरित्या फळबाग लागवड तंत्रज्ञान दिले जात आहे. पिकवलेले उत्पादन उच्च बाजारपेठेत विकले जाऊन शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळावा यासाठी निर्यातदार व्यापाऱ्यांशीही करार स्वरूपात पुढे पाऊल ठेवण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला जात आहे. यामुळे येणारे २०२६ हे वर्ष मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी नवी आर्थिक क्रांती घडवणारे असेल असे प्रतिपादन मयंक गांधी यांनी केले. जेष्ठ अर्थतज्ञ अशोक गुलाटी यांनी सेंद्रिय शेतीची गरज, मातीचे आरोग्य, फळबाग प्रक्रिया उद्योग, पायाभूत सुविधा, शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ इत्यादी विषयांवर सखोल चर्चा करून मतप्रदर्शन केले. जेष्ठ कृषी अर्थतज्ञ अशोक गुलाटी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र कृषीकुल येथे दोन दिवसीय दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांनी मराठवाड्यातील शेती, माती, पीकपद्धती आणि व्यापारपेठ या विषयावर सखोल अवलोकन केले. आजूबाजूच्या परिसरातील फळबाग उत्पादक शेतकरी उपस्थित झाले असता त्यांच्याशीही अनेक मुद्द्यांवर संवाद साधला. जलनायक मयंक गांधी यांनी मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या समस्या त्यांच्यासमोर ठेवून त्यावरील उपायही सुचवले व शासन स्तरावर शक्य तेवढे प्रयत्न करून त्यावरील उपाय करण्याचेही आवाहन केले. येणाऱ्या कालावधीत केंद्र शासन स्तरावर मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी शक्य तेवढा पाठपुरावा करू असेही गुलाटी यांनी मत व्यक्त केले.शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी जमिनीचा सेंद्रिय कार्बासोबत सूक्ष्म जीवांची वाढ करून उत्पन्न खर्चात बचत होऊ शकते. वास्तविक पाहता रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांचा ऱ्हास होत आहे. यामुळे जमिनीचा सेंद्रिय कर्ब कमी झाल्याने दिवसेंदिवस उत्पादकता घटत जात आहे. परिणामी शेतकऱ्यांचा उत्पन्नखर्च वाढत आहे. हा एक चिंतेचा विषय असून सेंद्रिय शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन, आवश्यक पायाभूत सुविधा दिले जाणे आवश्यक असल्याबाबतची चर्चा करण्यात आली.

## संत्रावर्गीय फळपिकांवरील कोळी कीडीचे नियंत्रण

मोसंबी व संत्रा फळ पिकांवर कोळी कीडीचा प्रादुर्भाव आढळून येत असतो. कोळी ही कीड अष्टपाद वर्गातील असून, आकाराने सूक्ष्म असते. साध्या डोळ्याने दिसणे कठीण जाते. पानांच्या शिराजवळ किंवा बरेचदा फळांच्या सालीवर बारीक खळग्यात ती अंडी घालते. प्रौढ लांबट, पिवळे असून, पिल्ले फिक्कट पिवळसर असतात. पिल्ले व प्रौढ कोळी आकाराचा फरक सोडल्यास सारखेच दिसतात. रस्ट माईट व ग्रीन माईट या कोळी प्रजाती आहेत.

रस्ट माईट प्रादुर्भावाची लक्षणे : कीड पाने व फळांचा पृष्ठभाग खरवडतात व त्यातून येणारा रस शोषून घेतात, त्यामुळे पानांवर आणि फळांवर करडे ठिपके आढळून येतात. प्रादुर्भाव वाढल्यास फळांवर तपकिरी लालसर रंगाचे चट्टे पडतात. या अवस्थेला शेतकरी 'लाल्या' म्हणून ओळखतात. या किडीमुळे फळांचे नुकसान होऊन अनियमित आकाराची फळे तयार होतात. प्रादुर्भावग्रस्त फळांचा रंग बदलतो व प्रत खालावते. त्यामुळे बाजारात कमी भाव मिळतो. कोळी किडीचे व्यवस्थापन : उन्हाळ्यामध्ये पाण्याचा ताण दिलेल्या झाडांना योग्य प्रमाणात पाणी मिळत आहे याची खात्री करून घ्यावी. पाण्याचा ताण पडल्यास कोळीचा प्रादुर्भाव वाढतो. अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा अझेंडीरॅक्टीन (५%) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड. नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) २% प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी. कोळीचा प्रादुर्भाव दिसताच डायकोफॉल (१८.५ ई सी) २ मिली किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्ल्यू पी) २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते.

## शेतकऱ्यांनी रब्बी पिकांचे असे करावे व्यवस्थापन

सध्या काही ठिकाणी रब्बी हंगाम पेरणी झाली आहे. आता काही पिकात आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. अगोदर लागवड झालेल्या काही पिकांवर किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीत विविध पिकांचे नियोजन कसे करावे याकडे शेतकऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

पूर्व हंगामी उसाची लागवड लवकरात लवकर संपवावी. ऊस लागवड करतांना ३० किलो नत्र, ८५ किलो स्फुरद व ८५ किलो पालाश (३२७ किलो १०:२६:२६ किंवा १८५ किलो डायअमोनियम फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश किंवा ६५ किलो युरिया + ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी खतमात्रा द्यावी. ऊस पिकावर खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % २५ मिली किंवा क्लोरॅंट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ऊस पिकावर पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० % ३६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% २० मिली किंवा डायमिथोएट ३० % १५ मिली प्रति १० लिटर पाण्यात



मिसळून आलटून-पालटून फवारणी करावी. हळदीचे उघडे पडलेल कंद मातीने झाकून घ्यावेत. हळद पिकात आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. हळदीच्या पानावरील ठिपके / करपा रोग याच्या व्यवस्थापनासाठी अझोक्सिस्ट्रॉबिन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% (पुर्वमिश्रित बुरशीनाशक) १० मिली + ५ मिली स्टीकरसह प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जोमदार वाढीसाठी हरभरा पीक सुरुवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पीक २० ते २५ दिवसाचे असतांना पहिली कोळपणी करावी.

मागील काही दिवसात किमान तापमानात झालेल्या घटीमूळे, वेळेवर लागवड केलेल्या करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १३ मिली किंवा असिफेट ७५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करडई पिकात तणांच्या व्यवस्थापनासाठी पेरणीनंतर २५ ते ५० दिवसापर्यंत एक ते दोन कोळपण्या व खुरपणी करून घ्यावी. लवकर पेरणी केलेल्या रब्बी ज्वारी पिकात लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असतांना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.फळबागेचे व्यवस्थापन : संत्रा/मोसंबी बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर तसेच जिब्रॅलिक ॲसिड १ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. संत्रा/मोसंबी बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. डाळींब बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. डाळींब व चिकू बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनूसार पाणी द्यावे.

## हरभरा पिकातील घाटे अळीचे एकात्मिक व्यवस्थापन

हरभरा हे रब्बी हंगामातील प्रमुख पीक आहे. या पिकात घाटे अळी या किडीच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट येत आहे. पिकाच्या सुरुवातीच्या काळात या किडीचा प्रादुर्भाव कमी असला तरी पुढे फुलोरा आणि घाटे लागण्याच्या अवस्थेत त्यात मोठी वाढ होते. घाटे अळीमुळे ३० ते ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. या बहूभक्षी किडीला नियंत्रणात ठेवण्यासाठी सुरुवातीपासूनच एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

पतंग : मजबूत बांध्याचा, फिकट विटकरी-पिवळसर रंगाचा असून, त्याच्या समोरील पंखांवर गडद ठिपका दिसतो. मागील पंख फिकट विटकरी रंगाचा असून त्यावर काळ्या रंगाची कडा दिसते.

अंडी : प्रौढ मादी कीड कोवळ्या शेंड्यांवर, पानांवर, तसेच कळ्यांवर आणि फुलांवर एकेक करून ३०० ते ५०० अंडी घालते. अंडी गोलसर, हिरवट-पिवळसर असून खसखशीच्या दाण्यासारखी दिसतात. अंडी उबण्याचा कालावधी ५ ते ७ दिवसांचा असतो.

अळी : अंड्यातून बाहेर पडलेल्या अळीची पूर्ण वाढ होण्यासाठी १४ ते १५ दिवस लागतात. पूर्ण विकसित घाटे अळी पोपटी रंगाची असली तरी पिकानुसार यात विविध रंगछटाही दिसतात. शरीराच्या बाजूला तुटक करड्या रेषा आढळतात. पूर्ण वाढलेली अळी ३० ते ५० मि.मी लांब असते. कोषावस्थेत जाण्यापूर्वी अळीची भूक १ ते २ दिवस मंदावते.

कोष : अळी झाडाच्या किंवा मुळांच्या आसपास जमिनीत ४ ते ५ सेमी खोलीवर मातीचे वेष्टण तयार करून त्यात कोषावस्थेत जाते. कोष तांबड्या रंगाचा असून १.५ ते २ से.मी. लांब असतो. कोषावस्थेत कीड एक आठवडा ते महिनाभर राहते. अशा प्रकारे किडीचा जीवनक्रम २५ ते ५२ दिवसांत पूर्ण होतो. ही कीड एका वर्षात ७ ते ८ पिढ्या पूर्ण करते. रब्बी हंगामात



हरभरा पिकात या किडीच्या २ ते ३ पिढ्या पूर्ण होतात.

एकात्मिक कीड व्यवस्थापन : पेरणीसाठी कीड-प्रतिबंधक वाणांची निवड करावी. पिकाची पेरणी योग्य वेळी आणि योग्य अंतरावर करावी. हरभरा पेरताना त्यासोबत १०० ग्रॅम प्रति हेक्टर ज्वारीचे बियाणे मिसळून पेरावे. गहू, मोहरी, जवस, कोथिंबीर यांसारखी आंतरपिके घेतल्यास त्यावर मित्रकीटकांचे संवर्धन होते. घाटे अळीचा प्रादुर्भाव कमी राहण्यास मदत होते.

शेत तणमुक्त ठेवावे. शेताच्या बांधावरील कोळशी, रानभेंडी, पेटारी यांसारख्या किडींच्या पर्यायी खाद्य वनस्पती नष्ट कराव्यात. पेरणीसोबत ज्वारीची दाणे मिसळले नसतील, तर पक्ष्यांना बसण्यासाठी पिकापेक्षा १ ते १.५ फूट अधिक उंचीचे इंग्रजी 'टी' आकाराचे २० ते २५ पक्षी थांबे प्रति हेक्टरी उभारावेत. घाटे अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ ते ६ कामगंध सापळे (हेक्झाल्यूर) प्रति हेक्टरी जमिनीपासून १ मीटर उंचीवर लावावेत.मोठ्या अळ्या हाताने वेचून रॉकेल-मिश्रित पाण्यात टाकून त्यांचा नायनाट करावा. पीक कळी अवस्थेत व फुले येत असताना, ॲझाडिरॅक्टीन (३०० पी.पी.एम.) २ ते ३ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. प्रभावी नियंत्रणासाठी, घाटे अळी प्रथम व द्वितीय अवस्थेत असताना एचएएनपीव्ही (५०० एलई) १ मि.लि. अधिक नीळ पाच ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे सायंकाळी फवारणी करावी. कॅम्पोलेटीस क्लोरिडी या मित्रकिटकामुळे शाकीय अवस्थेत ५ ते ५० टक्क्यांपर्यंत घाटे अळीचे नियंत्रण होऊ शकते. शेत परिसरामध्ये या मित्र कीटकांची संख्या भरपूर असल्यास त्यांच्या संवर्धनासाठी वनस्पतीजन्य कीटकनाशके किंवा मित्र कीटकांसाठी सुरक्षित अशाच रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. घाटे अळीसाठी आर्थिक नुकसान मर्यादा - सरासरी २ अळ्या प्रति मीटर ओळ, ५ टक्के घाट्यांचे नुकसान, किंवा कामगंध सापळ्यात सलग २-३ दिवस ८-१० पतंग आढळल्यास.

रासायनिक फवारणी : शेतामध्ये वरील आर्थिक नुकसानीची मर्यादा ओलांडली गेल्यास पुढीलपैकी एका शिफारशीत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा. (फवारणी प्रमाण प्रति १० लिटर पाणी)

इमामेक्टीन बेंझोएट (०५ टक्के एस.जी.) ४.४ ग्रॅम किंवा क्लोरॲण्ट्रानिलिप्रोल (१८.५ टक्के एस.सी.) २.५ मि.लि. किंवा फ्लुबेंडायअमाइड (३९.३५ टक्के एस.सी.) २ मि.लि.किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (०५ टक्के ई.सी.) १२.५ मि.लि. किंवा फ्लुबेंडायअमाइड (२० टक्के डब्ल्यू.जी.) ५ ग्रॅम किंवा क्विनालफॉस (२५ टक्के ई.सी.) २० मि.लि. किंवा फ्लुबेंडायअमाइड (८.३३ टक्के) अधिक डेल्टामेथ्रिन (५.५६ टक्के एस.सी.) (संयुक्त कीडनाशक) ५ मि.लि. किंवा नोव्हॅल्युरॉन (५.२५ टक्के) अधिक इंडोक्साकार्ब (४.५ टक्के एस.सी.) (संयुक्त कीडनाशक) १६.५ मि.लि.

नुकसानीचे स्वरूप :पीक ३ आठवड्यांचे झाल्यानंतर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येतो. लहान अळ्या सुरुवातीला पानांची खालची बाजू कुरतडून खातात, त्यामुळे पानांवर पांढरट डाग दिसतात. कोवळे शेंडेदेखील कुरतडून खातात, त्यामुळे पीक शेंडेविरहित दिसते. पुढील टप्प्यात, म्हणजेच फुलोऱ्याच्या आणि घाटे लागण्याच्या अवस्थेत प्रादुर्भाव वाढतो. अळ्या कळ्या व फुले खातात. घाटे लागल्यानंतर अळी घाट्यावरील आवरण कुरतडत गोलाकार ३ ते ५ मि.मी. व्यासाचे छिद्र करते. डोक्याचा अर्धा भाग घाट्यात खुपसून आतील दाणे खाऊन घाटे पोखरते. एक अळी साधारणतः ३० ते ४० घाट्यांचे नुकसान करते. काबुली हरभऱ्यावर देशी वाणांपेक्षा अधिक प्रादुर्भाव आढळतो. पिकाच्या सुरुवातीपासूनच एकात्मिक कीड नियंत्रण पद्धती न अवलंबल्यास पिकाचे ५ ते ३८ टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: ख्रिसमस डे ,राष्ट्रीय सुशासन दिवस

### महत्वाच्या घटना

१७७१ : मुघल प्रशासक दुसरा शाह आलम दिल्लीच्या सिंहासनावर बसले.
१७६३ : भरतपूर चे महाराजा सुरजमल यांची हत्या.
१९४६ : ताईवान ने संविधानाला स्वीकारले.
१९७४ : रोम जात असेलेले एअर इंडिया चे बोईंग ७४७ चे अपहरण.
१९७६ : 'आय. एन. एस. विजयदुर्ग' ही युद्धनौका भारतीय नौदलात सामील
१९९० : वर्ल्ड वाइड वेबची पहिली यशस्वी चाचणी
१९९१ : मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सोविएत संघराज्याच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. याच्या दुसऱ्याच दिवशी सोविएत संघराज्याचे विघटन करण्यात आले आणि जनमत चाचपणीच्या आधारे सर्वप्रथम युक्रेन हा देश सोव्हिएत संघराज्यातुन बाहेर पडला.
२००२ : चीन आणि बांगलादेश मध्ये संरक्षण करार पार पडला.
२००५ : ४०० वर्षाआधी लुप्त झालेला पक्षी ''डोडो'' चे दोन ते तीन हजार वर्ष जुने अवशेष आढळले.
२००८ : भारताने पाठविलेल्या चंद्रयान-१ च्या पेलोडर ने चंद्राचा पहिला नवीन फोटो पाठविला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४२ : सर आयझॅक न्यूटन इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ, गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडला. गणितातील 'कॅल्क्युलस' या शाखेचे जनक (मृत्यू: २० मार्च १७२७)
१८२१ : अमेरिकन रेड क्रॉसच्या संस्थापिका क्लारा बार्टन यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल १९१२)
१८६१ : पण्डित मदन मोहन मालवीय बनारस हिन्दू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९४६)
१८७२ : संस्कृत भाषेचे विद्वान पंडित गंगानाथ झा यांचा जन्म.
१८७६ : बॅ. मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे प्रणेते व पहिले गव्हर्नर जनरल (मृत्यू: ११ सप्टेंबर १९४८)
१८७८ : शेवरले कंपनीचे सहसंस्थापक लुई शेवरोलेट यांचा जन्म. (मृत्यू: ६ जून १९४१)
१८८६ : पाकिस्तानचे प्रणेते व पहिले गव्हर्नर जनरल बॅ. मुहम्मद अली जिना यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९४८)
१८८९ : रीडर डायजेस्टच्या सहसंस्थापिका लीला बेल वॉलेस यांचा जन्म. (मृत्यू: ८ मे १९८४)
१९११ : बर्न होगार्थ जंगलचा सम्राट टारझन याला कार्टुनद्वारे अजरामर करणारे अमेरिकन व्यंगचित्रकार, लेखक, शिक्षणतज्ञ (मृत्यू: २८ जानेवारी १९९६ पॅरिस, फ्रान्स)
१९१६ : अल्जेरियाचे पहिले अध्यक्ष अहमद बेन बेला यांचा जन्म. (मृत्यू: ११ एप्रिल २०१२)
१९१८ : अन्वर सादात इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष व नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ६ आक्टोबर १९८१)
१९१९ : नौशाद अली संगीतकार (मृत्यू: ५ मे २००६)
१९२१ : भारतीय-पाकिस्तानी पत्रकार आणि लेखक झैब-अन-नसीसा हमिदुल्ला यांचा जन्म. (मृत्यू: १० सप्टेंबर २०००)
१९२४ : अटलबिहारी बाजपेयी भारताचे १० वे पंतप्रधान, भारतीय जनता पक्षाचे नेते, असामान्य संसदपटू, अलौकिक वक्ते व उत्तुंग प्रतिभेचे ओजस्वी कवी, पद्मविभूषण
१९२५ : प्रसिद्ध चित्रकार सतीश गुजराल यांचा जन्म.
१९२६ : चित्त बसू संसदपटू, 'फॉरवर्ड ब्लॉक'चे सरचिटणीस (मृत्यू: ५ आक्टोबर १९९७)
१९२६ : डॉ. धर्मवीर भारती हिन्दी लेखक, कवी, नाटककार, पत्रकार व 'धर्मयुग' साप्ताहिकाचे २७ वर्षे संपादक, 'अभ्युदय' व 'संगम' या नियतकालिकांचे संपादनही त्यांनी केले. (मृत्यू: ४ सप्टेंबर १९९७)
१९२७ : पं. रामनारायण सुप्रसिद्ध सारंगीये
१९३२ : प्रभाकर जोग व्हायोलिनवादक, संगीत संयोजक व संगीतकार
१९३६ : भारतीय-इंग्रजी दिग्दर्शक व निर्माते इस्माईल मर्चंट यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २००५)
१९४९ : नवाझ शरीफ पाकिस्तानचे १२ वे पंतप्रधान
१९५९ : भारतीय कवी आणि राजकारणी रामदास आठवले यांचा जन्म.
१९८० : राष्ट्रवादी मुस्लीम नेते मुख्तार अहमद अंसारी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४९ : वॉर्नर ब्रदर्स कार्टूनचे संस्थापक लिओन स्चलिंगर यांचे निधन. (जन्म: २० मे १८८४)
१९५७ : प्रा. श्रीपाद महादेव तथा श्री. म. माटे साहित्यिक, विचारवंत व अस्पृश्यता निवारणासाठी सतत प्रयत्न करणारे कृतिशील समाजसुधारक. १९१६ मध्ये त्यांनी दलितांसाठी रात्रशाळा काढली व वीस पंचवीस वर्षे मोफत शिकवले. (जन्म: २ सप्टेंबर १८८६)
१९७२ : चक्रवर्ती राजगोपालाचारी भारताचे शेवटचे गव्हर्नर जनरल, मद्रास इलाख्याचे मुख्यमंत्री, स्वातंत्र्यसेनानी, कायदेपंडित, मुत्सद्दी आणि लेखक (जन्म: १० डिसेंबर १८७८)
१९७७ : चार्ली चॅपलिन अभिनेता, दिग्दर्शक आणि संगीतकार. त्यांच्या 'लाईम लाईट' या चित्रपटाला ऑस्कर पारितोषिक मिळाले होते. 'कीड ऑटो रेसेस ॲट व्हेनिस' या त्यांच्या दुसर्या चित्रपटातील डर्बी हॅट, घट्ट कोट ढगळ पॅंट, चौकोनी मिशा, बेढब जोडे आणि काठी या वेशभूषेमुळे चार्ली चॅप्लिन म्हणजे लोकांना मूर्तिमंत विनोद वाटू लागले. (जन्म: १६ एप्रिल १८८९)
१९८९ : रोमेनियाचे पहिले अध्यक्ष निकोला सीउसेस्कु यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १९१८)
१९९४ : ग्यानी झैलसिंग भारताचे ७ वे राष्ट्रपती, पंजाबचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री (जन्म: ५ मे १९१६)
१९९५ : डीन मार्टिन अमेरिकन गायक, संगीतकार व निर्माते (जन्म: ७ जून १९१७)
१९९८ : दत्तात्रय गोविंद तथा दत्ता खेबुडकर नाटककार व दिग्दर्शक
२०१५ : भारतीय अभिनेत्री साधना शिवदासानी यांचे निधन.

# तहसीलदाराचा वाळू माफियाला दणका

## ८० ब्रास वाळुचे उत्खनन केल्याप्रकरणी ८ जणाविरुद्ध गुन्हे दाखल; पोलीस पाटील जबाबदार?

जालना । प्रतिनिधी

अंबड तालुक्यामध्ये वाळू चोरी प्रकरणी पोलीस पाटील जबाबदार असल्याचे बोलल्या जात आहे. सदरील गावाची सर्व माहिती पोलीस पाटील यांना असती वाळू चोरीची माहिती महसूल प्रशासनाला देणे गरजेचे असते परंतु अशी माहिती महसूल प्रशासनापर्यंत येत नाही असे महसूल प्रशासन अधिकाऱ्याकडून सांगण्यात येते. वाळूप्रकरणी अशीच एक घटना मठ पिंपळगाव (ता. अंबड) शिवारातील दुधना नदी पात्रातून ८० ब्रास वाळुचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहन मालकांसह गुन्ह्यास सहाय्य करणारे, लोकेशन पुरवणारे सराईत गुन्हेगार पंडीत गंगाराम मदनुरे, देविदास पांडुरंग जिगे, अमोल शिवनाथ जिगे, कार्तिक विठ्ठल जिगे, रोहित संजय जगताप, रईस रऊफ सय्यद, शिवप्रसाद रामेश्वर लोणकर, गंगाराम पंडीत मदनुरे,



यांच्यावर तहसिलदार विजय चव्हाण यांच्या आदेशाने अंबड पोलीस ठाण्यात आठ लोकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

यामुळे इतर वाळु तस्करांमध्येही मोठी खळबळ उडाली आहे. यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, अंबड तहसिलदार विजय चव्हाण यांना खबऱ्यामार्फत मठ पिंपळगाव शिवारातील दुधना नदी पात्रामध्ये काही सराईत गुन्हेगार जेसीबी व ट्रॅक्टर्सच्या सहाय्याने रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वाळुचे उत्खनन व चोरी करीत असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. त्यानंतर तहसिलदार यांचे पत्र प्राप्त झाल्याने धनगर पिंपरी (ता. अंबड) सजाचे ग्राम महसुल अधिकारी स्वप्नील खरात हे काल सोमवारी (ता. २२) दुपारी १ वाजेच्या सुमारास धनगर पिंपरी महसूल मंडळ अधिकारी सुनील कारमपुरी, महसूल सेवक विश्वंभर केदार व गोला गावचे पोलीस पाटील महेंद्र भिंगारदेव यांच्यासह मठ पिंपळगाव येथील दुधना पात्रात पोहचले. स्वप्नील खरात व सहकाऱ्यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीअंती या अवैध व्यवसायात पुढील व्यक्ती व वाहनांचा सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यामध्ये पंडीत गंगाराम मदनुरे (मॅसी फर्ग्यूसन ट्रॅक्टर), देविदास पांडुरंग जिगे (कुबोटा ट्रॅक्टर), अमोल शिवनाथ जिगे (स्वराज ट्रॅक्टर), कार्तिक विठ्ठल जिगे (वाहन मालक कैलास भानुदास जिगे, ट्रॅक्टर जॉन डिअर) (सर्व रा. मठपिंपळगाव, ता. अंबड), रोहित संजय जगताप (जेसीबी चालक, रा. घोटण, ता. बदनापूर) त्याचप्रमाणे सदर गुन्ह्यास सहाय्य करणारे व लोकेशन देणारे रईस रऊफ सय्यद, शिवप्रसाद रामेश्वर लोणकर व गंगाराम पंडीत मदनुरे, (सर्व रा. मठ पिंपळगाव, ता. अंबड) यांचा समावेश आहे. याप्रकरणी कायदेशीर जरब बसवण्यासाठी व पर्यावरणाचा ऱ्हा थांबवण्यासाठी सक्त आदेश देण्यात येत आहेत असे पत्र प्राप्त झाल्यावरुन महसूलचे पथकाने मठपिंपळगाव शिवारात मठ पिंपळगाव ते घोटण गाव रस्त्यालगत दुधना नदी पात्रात पाहणी केली. तेव्हा सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळुचे अवैधरीत्या उत्खनन व वाहतुक केल्याचे दिसुन आले. सदर उत्खनन काही प्रमाणात असलेल्या पाण्यातून केलेले असल्यामुळे प्रत्यक्ष मोजणी करणे शक्य नव्हते तरी स्थानिक पातळीवर गोपनीय चौकशी केली असता अंदाजे ८० ब्रास वाळुचे अंदाजे ४ लाख रुपये वाळुचे उत्खनन व वाहतूक केल्याचे दिसुन आले. याप्रकरणी ग्राम महसूल अधिकारी स्वप्नील खरात यांच्या फिर्यादीवरून मठ पिंपळगाव शिवारातील दुधना नदी पात्रात अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांचे मालक व गुन्ह्यास सहाय्य करणारे, लोकेशन पुरवणारे यांच्या विरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात कलम ३०३ (२) ३ (५) ३२४ (४) ६१ भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र जमिन महसुल अधिनीयम १९६६ चे कलम ४८ (७) (८) नुसार व खाण अधिनीयम १९५२ कलम ३, ४ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ कलम ९ व १५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार सुभाष डोईफोडे हे करीत आहेत.

---

## पहिला महापौर भाजपाचा व्हावा यासाठी आई तुळजाभवानी ला साकडे घालणार - ना.भोयर



जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरु झाली असून या पहिल्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचा महापौर व्हावा याकरिता आपण आई तुळजाभवानी ला साकडे घालणार असून ते निश्चितच पूर्ण होईल असे आज (ता.२३) रोजी भाजपा जिल्हा कार्यालयात झालेल्या कार्यकर्ता संवाद कार्यक्रमात संवाद साधतांना ना.पंकज भोयर यांनी कार्यकर्त्यांना सांगितले. यावेळी आ.संतोष पाटील दानवे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, रामेश्वर पाटील भांदरगे, अशोक पांगारकर, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ते पुढे बोलताना म्हणाले कि, आपण आज तुळजापूर ला आई तुळजाभवानी च्या दर्शना करिता आपण तुळजापूर ला निघालो असून आमचे नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे दादा यांचा हा जिल्हा असल्याने व याठिकाणी महानगरपालिकेची निवडणूक सुरु असल्याने येथील कार्यकर्त्यांसोबत संवाद साधून महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टी ची निवडणूक तयारी विषयी माहिती जाणून घ्यावी व कुठल्याही परिस्थितीत जास्तीत जास्त भाजपचे नगरसेवक निवडून आणून याठिकाणी या महापालिकेत भारतीय जनता पार्टी चा महापौर व्हावा हे सांगण्यासाठी आपण थांबलो असून कार्यकर्त्यांनी प्रत्येक प्रभागात, वार्डात, जाऊन तसेच प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचवून भाजपचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणावे व पहिला महापौर भाजपाचा करावा असे त्यांनी सांगितले. यावेळी आ.संतोष पाटील दानवे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची हि मार्गदर्शनपर भाषणे झाली. यावेळी माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, राजेश जोशी, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, धनराज काबलीये, अर्जुन गेही, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे, अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळक आदींसह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## लिंग गुणोत्तर वाढीसाठी जनजागृती वर भर द्या - जिल्हाधिकारी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

'लेक लाडकी' अभियानासह शासनाच्या विविध उपक्रमांमुळे समाजात मुलींच्या जन्माचे स्वागत होत आहे. ही सकारात्मकता अधिक वृद्धिंगत करण्यासाठी व जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा समतोल राखण्यासाठी आरोग्य विभागाने गावनिहाय 'सूक्ष्म नियोजन' करावे, तसेच अवैध गर्भलिंग निदान रोखण्यासाठी गुप्त माहिती यंत्रणा अधिक सक्षम करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आज दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात 'गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी) कायदा' जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक डॉ. आशिया यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक तथा समिती सचिव डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापुसाहेब नागरगोजे, जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. सतिष पाटील यांच्यासह समितीचे अशासकीय सदस्य व वैद्यकीय अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर अधिक सुधारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासनाला त्रिसूत्री कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना केल्या. यामध्ये कायद्याची प्रभावी प्रसिद्धी करून लोकसहभाग वाढवणे, आशा सेविका व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने माहिती संकलित करणे व उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषण करून त्यानुसार कृती आराखडा तयार करणे या बाबींचा समावेश आहे.

ज्या गावांमध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण सुधारण्यास वाव आहे, अशा गावांवर विशेष लक्ष केंद्रित करून तेथील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्याचे आवाहन त्यांनी केले. माता व बालकांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी गरोदरपणात पहिल्या १२ आठवड्यांतच मातांची नोंदणी होणे अत्यंत आवश्यक आहे.

महानगरपालिका व ग्रामीण आरोग्य यंत्रणेने या 'लवकर नोंदणी' (अर्ली रजिस्ट्रेशन) प्रक्रियेवर भर द्यावा, जेणेकरून गरोदर मातांना वेळेवर आरोग्य सुविधा मिळतील आणि पीसीपीएनडीटी कायद्याचीही काटेकोर अंमलबजावणी होईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. तसेच, जिल्ह्यात १०० टक्के जन्म नोंदणीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रशासनाने कटिबद्ध रहावे. प्रसूती खाजगी रुग्णालयात, शासकीय संस्थेत किंवा जिल्ह्याबाहेर झाली तरीही त्याची अचूक नोंद आपल्याकडे असायला हवी. या कामात आशा सेविकांचे योगदान महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या कामाला प्रोत्साहन देण्यासाठी जन्म नोंदणीच्या कामाशी त्यांचा प्रोत्साहन भत्ता जोडण्यात यावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केली. बैठकीच्या सुरुवातीला जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी समितीच्या कामकाजाचा आढावा सादर केला. यावेळी आरोग्य, पोलीस, कायदा, न्याय, महिला व बालविकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते

---

## मोटारगाड्या, वाहनांच्या ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध

जालना । प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोगाने दि.१५ डिसेंबर २०२५ ते दि.१६ जानेवारी २०२६ या मतमोजणीच्या दिवसापर्यंत महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५-२६ साठी आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन जालना महानगरपालिका निवडणूक प्रचारफेरी/ मिरवणुकामध्ये जास्तीत जास्त १० वाहने वापरता येतील. त्यापेक्षा जास्त वाहने वापरण्यास महानगरपालिका क्षेत्रामध्ये निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

---

## आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत केंद्रीय प्रभारी अधिकाऱ्याकडून पाहणी

जालना । प्रतिनिधी

आकांक्षित तालुका कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसह विविध विकासात्मक उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी नीति आयोग, नवी दिल्ली मार्फत जालना जिल्ह्यातील आकांक्षित तालुका परतूर व बदनापूर साठी नियुक्त केंद्रीय प्रभारी अधिकारी डॉ. संदीप रेवाजी राठोड (भा.प्र.से.) यांनी परतूर तालुक्याचा दौरा केला. दौऱ्यादरम्यान केंद्रीय प्रभारी अधिकारी यांनी ग्रामपंचायत लोणी खुर्द ची पाहणी केली तेथील अंगणवाडी केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच पीएम श्री जिल्हा परिषद शाळा, लोणी खुर्द यांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी अंगणवाडी केंद्रांमध्ये गर्भवती व स्तनदा मातांचे पोषण व्यवस्थापन, मुलांसाठी पूरक पोषण योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या भोजनाची व्यवस्था, बालकांच्या वाढ मोजमाप (ग्रोथ



मॉनिटरिंग), पूर्व-प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता इ. चा सविस्तर आढावा घेतला.

तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये माता-बालक आरोग्य सेवा, एएनसी नोंदणी तपासणी, प्रसूतीगृहाची व्यवस्था पाहणी, औषोधोपचार पाहणी, तसेच उच्च जोखीम गर्भवती महिलांची ओळख व त्यांच्यासाठी उपलब्ध सेवांची पाहणी करण्यात आली. दौऱ्याच्या समारोपप्रसंगी डॉ. संदीप राठोड यांनी सांगितले की, आकांक्षित तालुका कार्यक्रमाची उद्दिष्टे यशस्वीरीत्या साध्य करण्यासाठी विभागीय समन्वय, नियमित देखरेख, मैदानी फॉलो-अप तसेच विकसित तालुका धोरणाचा पुनः अभ्यास करून त्यामध्ये समुदाय सहभागाचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी सर्व विभागांना निर्धारित उद्दिष्टे व निकषांनुसार वेळेत कार्यवाही करण्याचे, नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे तसेच शासकीय योजनांचा लाभ अंतिम घटकापर्यंत पोहोचविण्याचे निर्देश दिले. तसेच डेटा-आधारित नियोजन व सातत्यपूर्ण मूल्यांकन प्रणाली अधिक सक्षम करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. या दौऱ्यादरम्यान जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती पी. एम. मिन्नू (भा. प्र. से.), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), गट विकास अधिकारी, महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी (पंचायत), सरपंच लोणी खू., ग्राम पंचायत अधिकारी जालना जिल्हा अध्यक्ष उमेद अभियानाचे तालुका अभियान व्यवस्थापक तसेच आकांक्षित तालुका फेलो उपस्थित होते.

---


जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.११६/२०२५**

**पुष्पाबाई पि. केरबा कसबे विरुद्ध**

**ग्रामपंचायत कार्यालय मैंदा**

पहा

पुष्पाबाई पि. केरबा कसबे रा.मैंदा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक पुष्पाबाई पि. केरबा कसबे यांचा दिनांक १४/०१/१९६२ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस मैंदा ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे मैंदा ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १७/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १७/०१/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**

**तहसिलदार, बीड**



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/७३९

कार्यालय नगर परिषद, अंबड

दिनांक :- १६/१२/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) वर्षा अनिरुद्ध मिरकड सर्व्हे नं.-४५१ प्लॉट नं. १३ नं.प.मि.नं.१८-१५९-१३ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१५९-१३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा

पुर्व- गट नं. ४५२

पश्चिम : रस्ता

दक्षिण- याच प्लॉटचा भाग

उत्तर- अवधुत अशोक गायकवाड व शिवकन्या अशोक गायकवाड यांचा प्लॉट मधील भाग

स्वाक्षरित

**मुख्याधिकारी**

**नगर परिषद, अंबड**


---

## महानगरपालिकाच्या निवडणूक बैठकीला १६५ कर्मचाऱ्यांची दांडी

जालना। प्रतिनिधी

महानगरपालिकेतील काही कर्मचाऱ्याकडून निवडणूक संदर्भातील बैठकीला गैरहजर राहणारे कर्मचाऱ्याला वाचण्याचा प्रयत्न होत आहे. यासंदर्भात एका अधिकाऱ्याला गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी मागितली असता यादी देण्यास नकार दिला आहे यावरून असे दिसून येते की काही गैरहजर राहणारे कर्मचारी यांना वाचण्याचा प्रयत्न होत आहे.जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा दुवा असलेल्या मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांचे सखोल प्रशिक्षण आज, २४ डिसेंबर २०२५ रोजी सेंट मेरी हायस्कूल येथे दोन सत्रांत पार पडले. या प्रशिक्षणास जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी प्रत्यक्ष भेट देऊन मार्गदर्शन केले. दरम्यान, प्रशिक्षणास अनुपस्थित राहिलेल्या १६५ कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कडक पावले उचलत त्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावली आहे. सदरील याप्रकरणी निवडणूक आयोगाच्या नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

प्रशिक्षणार्थींची घेतली 'परीक्षा' निवडणूक इतिहासात प्रथमच प्रशिक्षणादरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. प्रशिक्षणार्थींना प्रश्नपत्रिका देऊन त्यांचे निवडणूक विषयक ज्ञान आणि प्रशिक्षणाचे आकलन तपासण्यात आले. या अभिनव उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रशिक्षणाबाबत कमालीची गांभीर्यने दिसून आली.

उपस्थिती आणि गैरहजेरीचा तपशील निवडणूक कार्यासाठी एकूण २,७१३ अधिकारी व कर्मचाऱ्यांना आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यापैकी २,५४८ कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थित होते, तर १६५ जण गैरहजर राहिले. मतदान केंद्राध्यक्ष: ६७३ पैकी ५५ अनुपस्थित. मतदान अधिकारी-१: ५५० पैकी १३ अनुपस्थित. मतदान अधिकारी-२: ५८५ पैकी ३६ अनुपस्थित. मतदान अधिकारी-३: ९०५ पैकी ६१ अनुपस्थित. गैरहजर राहिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याच्या दृष्टीने नोटीस पाठविण्यात आलेल्या आहे.तज्ज्ञ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन प्रशिक्षणाचे पहिले सत्र सकाळी १० ते १ या वेळेत उपविभागीय अधिकारी श्री. रामदास दौड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तर, दुसरे सत्र दुपारी २ ते ५ या वेळेत श्री. विजय चव्हाण, तहसीलदार अंबड यांनी घेतले. यावेळी मतदान यंत्रांची हाताळणी, मतदानाची गोपनीय प्रक्रिया आणि आपत्कालीन परिस्थितीतील नियोजन यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशासकीय यंत्रणेची मेहनत हे महाप्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी उपजिल्हाधिकारी श्रीमती नम्रता चाटे, उपायुक्त श्रीमती नंदा गायकवाड यांची उपस्थिती होती यांच्यासह जालना महानगरपालिकेचे सर्व मनुष्यबळ व्यवस्थापन पथकाने परिश्रम घेतले. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि त्रुटीरहित पार पाडण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी पूर्ण क्षमतेने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

---

## महानगरपालिका निवडणुकीत बाजारपेठांमध्ये राजकीय कार्यक्रमांना परवानगी देऊ नये-व्यापारी महासंघ

जालना। प्रतिनिधी

जालना शहरात सध्या महानगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, याच पार्श्वभूमीवर व्यापारी व ग्राहकांना होणारा त्रास लक्षात घेता व्यापारी प्रतिष्ठान तसेच बाजारपेठांमध्ये कोणत्याही प्रकारच्या राजकीय कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशी ठाम मागणी जालना व्यापारी महासंघाच्यावतीने अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्याकडे करण्यात आली आहे.

या संदर्भात जालना व्यापारी संघटनेचे वतीने सतीश पंच यांच्या नेतृत्वाखाली कॅटचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमल बंब, व्यापारी महासंघाचे जिल्हा कार्याध्यक्ष दीपक भुरेवाल, अनिल पंच यांनी अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी मंगळवार दि. २४ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निवडणूक काळात विविध राजकीय पक्षांचे उमेदवार, पक्ष कार्यकर्ते शहरातील व्यापारी प्रतिष्ठान किंवा बाजारपेठांच्या ठिकाणी सभा, प्रचार कार्यक्रम आयोजित करतात. यामुळे त्या ठिकाणी वाहतूक कोंडी, गर्दी, गोंधळ निर्माण होतो आणि



व्यापाऱ्यांना आपली दुकाने तात्पुरती बंद ठेवावी लागतात. परिणामी व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होते तसेच ग्राहकांनाही अनावश्यक गैरसोयींना सामोरे जावे लागते.

याशिवाय, काही वेळा उमेदवार किंवा कार्यकर्त्यांकडून व्यापाऱ्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या प्रतिष्ठानांवर बॅनर, पोस्टर, फलक किंवा प्रचार साहित्य लावले जाते. तसेच प्रचारासाठी फोटो, व्हिडीओ चित्रीकरणही परवानगीशिवाय केले जाते. हा प्रकार व्यापाऱ्यांच्या हक्कांवर अतिक्रमण करणारा असून, त्याला आळा घालण्याची गरज असल्याचे महासंघाने स्पष्ट केले आहे. सर्व राजकीय पक्षांच्या उमेदवारांना निवडणूक प्रचारासाठी व्यापारी प्रतिष्ठान, बाजारपेठ किंवा व्यावसायिक संकुलांचा वापर करण्यास सक्त मनाई करण्यात यावी. तसेच व्यापाऱ्यांच्या स्पष्ट लेखी परवानगीशिवाय कोणतेही प्रचार साहित्य लावू नये किंवा प्रचार कार्यक्रम आयोजित करू नयेत. या नियमांचे उल्लंघन झाल्यास तातडीने कारवाई करावी, अशी विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे. प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय अपेक्षित असून, निवडणूक प्रक्रिया शांततेत, शिस्तबद्ध व व्यापारी-नागरिकांना कोणताही त्रास न होता पार पडावी, तसेच अनेक पक्षाची मंडळी मान्यवरांची नावे आपल्या राजकीय पोस्टर आणि बॅनरवर टाकतात. परवानगीशिवाय असे फोटो त्यावर घेऊ नयेत, हीच सर्वांची अपेक्षा असल्याचे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांनी म्हटले आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

गुरुवार दि. २५ डिसेंबर २०२५ | ६

# वडवणीच्या शासकीय जागेतील पंचेवीस अतिक्रमित गाळे हटविले








वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी शहरातील तहसील परिसरातील व दिवाणी व फौजदारी न्यायालयात समोरील गट नंबर ६५६ मध्ये शासकीय जागेमध्ये अमिन कॉम्प्लेक्सचे २५ गाळे काल प्रशासनाने संपूर्ण पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण जमीन दोस्त केले आहे.**

वडवणी शहरातील शासकीय जागेवरील अतिक्रमणांचा मुद्दा गेल्या अनेक वर्षापासून गाजत असून यामध्ये शासकीय कार्यालय निवासस्थानाला जागा उपलब्ध होत नसल्यामुळे प्रशासनाने अतिक्रमण धारकावर कारवाई करण्याचा बडगा उगारला असून यामध्ये वडवणी शहरातील शासकीय कार्यालय असणाऱ्या तहसील कार्यालय परिसरातील व दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोरील ६ ५६ गटाची गेल्या काही महिन्यापूर्वी शासकीय मोजणी करण्यात आलेली होती . यामध्ये या शासकीय जागेमध्ये काही जणांनी अमिन कॉम्प्लेक्स तयार केले होते यामध्ये जवळपास पत्र्याचे २५ गाळे होते

◀◀ पान ३ वर

# सगळीकडेच तोंड मारणाऱ्या फिरस्त्याची चालबाजी उघड!



## आता म्हणतो माझ्यामुळेच विजय मात्र निकालाच्या आधी करीत होता विरोधकांच्या दारी तोंडमारी

बीड । प्रतिनिधी

**बीड नगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या निकालाने जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. अजित पवार गटाची राष्ट्रवादी, भाजप आणि शरद पवार गटाची राष्ट्रवादी यांच्यात झालेल्या अत्यंत अटीतटीच्या लढतीत अखेर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीच्या उमेदवाराने नगराध्यक्षपदावर बाजी मारली, तर भाजपचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर फेकला गेला.**

मतविभागणी, राजकीय समीकरणे आणि मतदानाचा कल पाहता शेवटच्या टप्प्यापर्यंत भाजपचा उमेदवार निवडून येईल, अशीच अटकळ राजकीय जाणकारांकडून बांधली जात होती. मात्र ऐनवेळी चित्र बदलले आणि राष्ट्रवादीच्या घडीच्या उमेदवाराने विजय मिळवला.

मात्र या निकालानंतर आता श्रेय लाटण्याची स्पर्धा सुरू झाली असून, त्यात एक सर्वत्र तोंड मारणारा, कायमच इकडे-तिकडे फिरणारा आणि स्वतःला सर्वात हुशार समजणारा फिरस्ता कार्यकर्ता आघाडीवर दिसून येत आहे. या व्यक्तीने या विजयाचे संपूर्ण श्रेय स्वतःकडे घेण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू केला आहे. खरी बाब मात्र वेगळीच आहे. निकालाच्या आधी हाच फिरस्ता कार्यकर्ता थेट विरोधकांच्या दारी जाऊन ठाण मांडून बसल्याचे अनेकांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. मतदारांचा कल भाजपकडे झुकत असल्याचे लक्षात येताच, या महाशयांनी सरळ घडी बाजूला सारून कमळाच्या उमेदवाराच्या दारात हजेरी लावली.

प्रचारादरम्यान आणि प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी लोकांचा कल काय आहे हे स्पष्ट होऊ लागल्याने, संधीसाधू

◀◀ पान ३ वर

## शासकीय हमीभावाने होणार मूग उडीद सोयाबीन धान्याची खरेदी –सानप, शेकडे यांचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्यादित आष्टी तालुका आष्टी जिल्हा बीड या संघाच्या माध्यमातून नाफेड अंतर्गत शासकीय हमीभाव योजनेतून शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी प्रक्रिया सुरू होणार असून मूग उडीद आणि सोयाबीन या धान्याची शासकीय निर्धारित केलेल्या मूल्यानुसार खरेदी केली जाणार आहे.**

आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून आणि प्रयत्नातून हे शासकीय हमीभाव धान्य खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे त्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा फायदा होणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी नोंद करावी असे आवाहन आष्टी तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे चेअरमन अतुल आदिनाथ सानप आणि सचिव बबन रोहिदास शेकडे यांनी केले आहे.

खरेदी-विक्री संघाचे केंद्रावर मूग ७६६८ रुपये उडीद ७८०० आणि सोयाबीन ५३२८ रुपये प्रतिक्विंटल या दरानुसार शेतकऱ्यांची धान्य खरेदी करण्यात येणार आहे या खरेदीसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणी वेळी शेतकरी स्वतः उपस्थित राहणे आवश्यक आहे नोंदणीसाठी आधार कार्ड बँक पासबुक आठ अ आणि सातबारा उतारे तसेच ही पीक पाहणी केली असणे आवश्यक आहे अशी माहिती चेअरमन अतुल सानप यांनी दिली असून आष्टी तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी शासनाच्या या हमीभाव योजनेचा लाभ घ्यावा आणि वेळेत नोंदणी करून धान्य विक्रीसाठी पुढे यावे असे आवाहनही करण्यात आले आहे आष्टी येथील किसान क्रांती जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था तहसील कार्यालय शेजारी या ठिकाणी हे खरेदी केंद्र सुरू करण्यात आले असून या केंद्रामुळे शेतकऱ्यांना शासकीय हमीभावाने पिकांना चांगला भाव मिळणार असल्याने शेतकरी वर्गाचा चांगला फायदा होणार आहे

## शिरूर पोलिसांनी केला फरार आरोपी अटक

बीड । प्रतिनिधी

गेल्या तीन महिन्यापासून फरार असलेला शुभम केदार याला शिरूर पोलिसांनी वारणी येथे ताब्यात घेतले.




कलम १०९, ४९, ११५(२),३५२,३५१(२),३(५) इछड मधील ०३ महिन्यापासून फरार असलेला पाहिजे आरोपी नामे शुभम बाळू केदार वय २४ वर्षे रा. वारणी, ता. शिरूर कासार हा दिनांक २३.१२.२५ रोजी रात्री ०६.३० वाजताच्या सुमारास माणूर, ता. शिरूर कासार परिसरात आल्याची गोपनीय बातमीदार मार्फत माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस पथकासह जाऊन आरोपी मिळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. सदर कार्यवाही मध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, पोलीस उपनिरीक्षक देविदास खांडखुळे, पो ह १८४ /खाडे व पो ह ९५६ /रवींद्र नागरगोजे, पो ह १८६/अनिल तांदळे यांचा समावेश आहे.

◀◀ पान ३ वर

## शुक्रवारी महेश सहकारी साखर कारखान्यावर शेतकरी मेळाव्याचे आयोजन –माजी आ.भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी



तालुक्यातीलमहेश सहकारी साखर कारखान्याच्या वतीने तालुक्यातील व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी योग्य ऊस व्यवस्थापन या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर भव्य मार्गदर्शनपर शेतकरी मेळाव्याचे आयोजन शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वा.महेश साखर कारखान्याच्या कार्यस्थळी करण्यात आले आहे. या मेळाव्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले आहे.

या मेळाव्यात ऊस उत्पादन वाढ, उत्पादन खर्चात बचत,आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमास कारखान्याचे चेअरमन,सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी, -उत्र्ख चे वरिष्ठ अधिकारी, खख उरीश र्‍ोपवरींळेप चे प्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचे आगमन होणार असून त्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात येणार आहे.त्यानंतर उपस्थित शेतकरी बांधवांचे स्वागत करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे संचालक करणार असून कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा उपस्थितांसमोर मांडली जाणार आहे.या मार्गदर्शनपर कार्यक्रमात खख उरीश र्‍ोपवरींळेप व -उत्र्ख चे अधिकारी विठ्ठल भापकर हे ऊस लागवड पद्धती, सुधारित बियाणे, योग्य खत व्यवस्थापन,पाणी नियोजन,रोग व किड नियंत्रण, उत्पादन वाढीसाठी आवश्यक असलेल्या आधुनिक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. II Care Foundation च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध शेतकरीपूरक योजनांची माहिती देण्यात येणार आहे.यानंतर नाना ऊस तंत्रज्ञानाचे तज्ज्ञ श्री. नवनाथ गायकवाड हे आधुनिक ऊस तंत्रज्ञान,नव्या लागवड पद्धती, कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळवावे,ऊसाची गुणवत्ता कशी सुधारावी, शाश्वत ऊस शेतीबाबत सखोल मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे मार्गदर्शन मिळणार असल्याने हा कार्यक्रम उपयुक्त ठरणार आहे. -CFI च्या मान्यवरांच्या मनोगतातून

◀◀ पान ३ वर

## निवडणूक निकाल प्रक्रिया शांततेत पार, नवनीत काँवत यांच्याकडून बीड शहर पोलिसांचे कौतुक

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील निवडणूक निकाल प्रक्रिया अत्यंत चुरशीची असतानाही बीड शहर पोलिसांनी केलेल्या काटेकोर नियोजनामुळे संपूर्ण प्रक्रिया शांततेत, सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. मतमोजणी प्रक्रियेदरम्यान उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींसाठी चार टप्प्यांमध्ये स्वतंत्र रांगा तयार करण्यात आल्या होत्या. मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता गर्दी चार भागांत विभागण्यात आली होती. त्यामुळे गर्दी नियंत्रण अधिक सुलभ, सुरक्षित व नियोजनबद्ध झाले. या व्यवस्थेमुळे मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश नियंत्रित पद्धतीने झाला व कोणताही गोंधळ, धक्काबुक्की अथवा अनुचित प्रकार घडला नाही.

या बंदोबस्तासाठी बीड शहर पोलिसांनी १२० पोलीस कर्मचारी व ३० अधिकारी तैनात केले होते. शहराच्या प्रत्येक भागामध्ये फिक्स पॉईंट ठेवण्यात आले होते. तसेच प्रत्येक पोलीस ठाण्याकडून दोन चारचाकी वाहनांद्वारे, एकूण आठ वाहनांमार्फत संपूर्ण शहरात विशेष गस्त घालण्यात आली होती. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ढोल-ताशा, मिरवणूक व विजयी जल्लोषावर बंदी घालण्यात आली होती. यामुळे पराभूत व विजयी उमेदवारांमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता पूर्णपणे टाळण्यात आली. निकालाच्या दिवशी समाजकंटकांवर सुरुवातीपासूनच दबाव ठेवण्यात आला असून १४५ व्यक्तींना तडीपार करण्यात आले होते. बीड शहरातील निवडणूक व निकाल अत्यंत चुरशीचा असतानाही पोलिसांच्या सतर्कतेमुळे समाजकंटकांना कोणतीही संधी मिळाली नाही. या सर्व उपाययोजनांचा मोठा फायदा शहरातील शांतता, सलोखा व सुरक्षितता राखण्यास झाला असून, बीड शहर पोलिसांच्या या उत्कृष्ट नियोजनाचे सामान्य नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी दिलेल्या सूचनांनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांनी बीड शहरात प्रभावी अंमलबजावणी केली. या संपूर्ण प्रक्रियेत पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, प्रवीण बांगर व मारुती खेडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.सायंकाळी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी संपूर्ण पोलीस पथकाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

## सिंदफना नदीपात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्यावर कारवाई



बीड । प्रतिनिधी

दिनांक २३ डिसेंबर रोजी गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, कुर्ला शिवारातील सिंदफना नदीपात्रामध्ये अवैध वाळू उपसा सुरू आहे. सदर माहितीच्या आधारे काकरवाल, पोह राऊत व पोह गायकवाड यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन छापा कारवाई केली.

छापा दरम्यान एक ट्रॅक्टर रेती भरताना आढळून आला. पोलिसांना पाहताच ट्रॅक्टर चालकाने ट्रॉली नदीपात्रात सोडून ट्रॅक्टरचे हेड घेऊन एरंडगावच्या दिशेने पळ काढला. नमूद स्टाफ यांनी नदीपात्रात त्याचा पाठलाग केला; मात्र आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला. त्यानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने नदीपात्रात फसलेली ट्रॉली ही तीन ट्रॅक्टर हेडच्या सहाय्याने बाहेर काढून पोलीस स्टेशन येथे आणण्यात आली. चौकशीत घटनास्थळावरून फरार झालेल्या आरोपीचे नाव गणेश हनुमानराव लाखे, रा. एरंडगाव, ता. गेवराई, जि. बीड असे निष्पन्न झाले. सदर आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन बीड ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४४४/२५, कलम ३०३(२) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांचे मार्गदर्शनात काकरवाल, पोह राऊत व पोह गायकवाड यांनी केली आहे.

अवैध वाळू उपशाविरोधात अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी सांगितले आहे.

## देव दहिफळ श्री तुळजाभवानी मंदिर येथे शिवपुराण कथा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील श्री क्षेत्र देव दहिफळ येथे श्री तुळजाभवानी प्रतिष्ठान वतीने दरवर्षी प्रमाणे होणाऱ्या उत्सवात शिवपुराण कथा व कीर्तन महोत्सव शेतकरी पुत्राचा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे.

विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी गेली सहा वर्षे पासुन सर्व महाराज मंडळी निरपेक्ष भावनेने मानधन न घेता कथा व कीर्तन सेवा करतात. या वर्षी दि. २७ शनिवार रोजी मोहत्सव प्रारंभ होणार आहे सकाळी ८ते १० गुरूचरीत्र पारायण १० ते १२ राम कृष्ण हरि नामजप दुपारी १ ते ४. शिवपुराण कथा हभप विष्णु महाराज रासवे यांच्या अमृत वानीतुन संपन्न होणार आहे व रोज रात्री ८ ते १० हभप श्रीराम महाराज शेळके ,हभप. प्रभाकर नाना झोलकर गंगाखेड, हभप आप्पासाहेब महाराज चौरे, चौंडी संस्थान, गोसेवक हभप माऊली महाराज कदम आळंदीकर , हभप माऊली महाराज काकडे धाराशिव, हभप संतोष महाराज आमलेकर, हभप नामदेव महाराज घाटुळ, हभप वासुदेव बाबा टाकळीकर,

व ३जानेवारी शनीवार रोजी सकाळी १० ते १२ हभप श्रीगुरु पुंडलिक महाराज देहुकर (जगद्गुरु श्री संत तुकाराम यांचे ११वे वंशज) यांचे काल्याचे कीर्तन व शेतकरी पुत्र श्री रविराज साबळे पाटील यांना सर्व महाराज मंडळी च्या उपस्थित सन्मान व महाप्रसाद आयोजन करण्यात येणार आहे.व सिद्धेश्वर गुरुजी सोळंके, वैद्यनाथ नाना काशीद, सुशेन महाराज काशिद, उध्दव महाराज कोथिंबीरे ,दत्ता महाराज सोनवणे, बाळू महाराज बडे, गोरख महाराज सव्वाशे, शंकर महाराज फाटे, उत्तरेश्वर महाराज जाधव माऊली महाराज जगताप,

## कामगार महिलेची मुलगी बनली फौजदार, शहरात होणार भव्य सत्कार

शरद रेडेकर । आष्टी

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन आष्टीची उजमा शेख पीएसआय चे प्रशिक्षण पूर्ण करून आष्टीत येत असून तिच्या आगमनानिमित्त आष्टी नगरीत तिचे सहर्ष स्वागत करण्यात येणार असून दिनांक २५ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता तिच्या निवासस्थानावरून तिचे आष्टी शहरात भव्यदिव्य स्वागत केले जाणार आहे.असे कार्यक्रमाचे नियोजन आझाद नगर ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

आष्टीची उजमा शेखची एमपीएससीद्वारे पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली जणू काही ती आली तिने पाहिलंआणि तिने जग जिंकलं असाच काहीसा प्रकार आष्टीच्या आझाद नगर भागातील जिद्दी वडील हयात नसताना स्व कष्टाने घराची जेमतेम परिस्थिती असताना एम पी एससी द्वारे थेट पी एस आय च्या पदालाच गवसणी घातली आहे ती उजमा सलीम शेख ने घरची




जेमतेम परिस्थिती आई आष्टीच्या कन्या शाळेमध्ये शालेय पोषण आहाराचा

भात शिजवण्यासाठी जाते घरात लायब्ररी नाही कुठलीही शिक्षणाची सोय नाही मात्र प्रचंड जिद्द व जिद्दीवर लढण्याचे असलेले मनोबल याची उत्तुंग साथ घेत अखेर उजमा शेख ने पाच वर्षाचा संघर्षाला विराम देत हे यश संपादन केले

बारावीपासूनच तिला पीएसआय व्हायचे स्वप्न होते मात्र हे स्वप्न कसे पूर्ण होणार यासाठी तिने खडतर प्रवास करत योग्य अभ्यास व नियोजनबद्ध

अभ्यासाद्वारे एमपीसी घेण्यात आलेल्या पीएसआय च्या परीक्षेत घवघवीत मिळवले तिच्या घरची परिस्थिती व तिच्या आईची मुलाखत घेतली असता बडील मृत्यू होऊन २७ बर्षे पूर्ण झाले आहेत आईने उजमा चार वर्षांची असताना तिचा सांभाळ करत तिच्या मागे खंबीरपणे ती उभी राहिली व उजमाने देखील आईच्या खडतर प्रयत्नांना साथ देत एमपीएससी मध्ये यश मिळवले आहे उजमाची आई ही आष्टी येथील कन्या शाळेमध्ये शालेय पोषण आहाराचा भात शिजवण्याचे काम करते. तर घरामध्ये शिक्षणाची सोय नाही अभ्यास कुठे करायचा लोक नाव ठेवतील या भीतीपोटी घरामध्ये असलेल्या बाथरूमला तिने लायब्ररी करून १६ १६ तास अभ्यास करून यश मिळवले आहे असा हा तिचा संघर्ष चा प्रवास इतर मुलींना प्रेरणादायी ठरण्यास मदत ठरेल. वडील हयात नसताना आईने संघर्ष करून मुलीस अखेर पीएसआय बनवलेच

पीएसआय बनण्याचा मान मिळवला आहे नुकताच ऑनलाईन आलेल्या निकालांमध्ये उजमा शेख हिची पोलीस खात्यामध्ये एमपीएससी द्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेत घवघवीत यश मिळाले होते.

तिची पीएसआय पदी निवड झाली होती याबद्दल तिचे सर्वत्र स्वागत देखील करण्यात आले असून नुकतेच तिने प्रशिक्षण पूर्ण करून ती आष्टी नगरीत तिचे आगमन होत आहे त्याबद्दल तिचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

cmyk



# पुणे महापालिका निवडणूकीत ब्राह्मण समाजाचा प्राधान्याने विचार व्हावा




**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात ब्राह्मण मतदारांची संख्या सुमारे १६ ते १८ टक्के एवढी असतांना राजकीय पक्षांकडून नेहमीच ब्राह्मण उमेदवारांना डावलले जात असल्याची भावना आहे, त्यामुळे येत्या पुणे महानगरपालिका निवडणूकीमध्ये ब्राह्मण समाजाला योग्य आणि पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी सर्वच राजकीय पक्षांना सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने आज येथे आवाहन करण्यात आले. यावेळी समन्वयक भालचंद्र कुलकर्णी, सह-समन्वयक ड. ईशानी जोशी, प्रवक्ते विश्वजीत देशपांडे, राजकीय समितीचे सदस्य विश्वनाथ भालेराव, मंदार रेडे, मकरंद माणकीकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सकल ब्राह्मण समाज समितीमध्ये पुण्यातील आम्ही सारे ब्राह्मण, परशुराम हिंदू सेवा संघ, ब्राह्मण जागृती सेवा संघ, अ. भा. ब्राह्मण महासंघ, महाराष्ट्र चित्पावन संघ, चित्पावन अस्तित्व संस्था, देशस्थ ऋग्वेदी शिक्षणोत्तेजक संस्था, याज्ञवल्क्य आश्रम, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, महाराष्ट्र ब्राह्मण सभा, कृष्ण यजुर्वेदी तैतरीय संघ, शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन मध्यवर्ती ब्राह्मण मंडळ, पुणे, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक), पुणे केंद्र, विप्र फौंडेशन, सर्वशाखीय ब्राह्मण महासंघ, पौरोहित्य पुरोहित फौंडेशन, गौड सारस्वत ब्राह्मण संघ अशा सुमारे ३० ब्राह्मण संस्था, संघटना सदस्य आहेत.

नुकत्याच झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतीमध्ये देखील ब्राह्मण समाजातील सुमारे ५० कार्यकर्ते निवडून आले आहेत. एकट्या मराठवाड्यात ५ ठिकाणी ब्राह्मण नगराध्यक्ष निवडून आले आहेत. कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातून देखील मोठ्या संख्येने ब्राह्मण उमेदवार निवडून आले आहेत. गेल्या विधानसभा निवडणूकीच्या वेळी देखील ब्राह्मण समाजातील अनेक चांगल्या कार्यकर्त्यांनी निवडणूक लढवली होती, त्याला चांगला प्रतिसाद मिळाला होता. महाराष्ट्रातील विविध २९ महापालिकांच्या निवडणूकीत देखील याची पुनरावृत्ती व्हावी, यादृष्टीने ब्राह्मण उमेदवारांना पुरेसे प्राधान्य द्यावे, प्रामुख्याने ब्राह्मण बहुल असलेल्या प्रभागांमध्ये याचा नक्कीच विचार व्हावा असे सर्वच राजकीय पक्षांना आवाहन केले आहे. याबरोबरच सर्वसाधारण गटांमधून केवळ खुल्या प्रवर्गातीलच उमेदवारांना प्राधान्य देण्यात द्यावे, त्यामध्ये आरक्षित समाजातील उमेदवारांना तिकीट देऊ नये, असे देखील आवाहन आम्ही राजकीय पक्षांना केले आहे. याबाबत भाजप म्हणून आम्ही राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांना भेटून निवेदन दिले आहे, ज्यात विविध प्रभागातील सुमारे ३० उमेदवारांची यादी देखील दिलेली आहे व यावर सकारात्मक विचार होईल असे आश्वासन त्यांनी दिले आहे. त्याचबरोबर महायुतीचे घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) यांना देखील हे आवाहन केलेले आहे. काँग्रेस पक्षाच्या पुण्याची नेत्यांना देखील आम्ही लवकरच भेटणार आहोत

# आई-वडिलांच्या आज्ञेचे पालन करा - डॉ. हंकारे



ओतूर । प्रतिनिधी

मोबाइलचा अतिवापर आणि वाईट संगतीमुळे तरूण पिढी आई-वडिलांचा अनादर करताना दिसत आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांनाच खरे दैवत मानावे आणि त्यांच्या आज्ञेचे पालन करावे, असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार डॉ. वसंत हंकारे यांनी केले. ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित सरस्वती विद्यालय उदापूरच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी ते बोलत होते.

मुलींवर होणारे अत्याचार, बदललेली सामाजिक परिस्थिती आणि संस्कारांची गरज यावर डॉ. हंकारे यांनी सखोल विचार व्यक्त केले. आई-वडील मुलांच्या संगोपनासाठी अपार कष्ट घेतात, त्यामुळे मुलांनी कितीही मोठे झाले तरी त्यांना विसरू नये. संस्कार आणि चांगल्या सवयी या बाजारात विकत मिळत नसून त्या शाळेतच रुजवल्या जातात, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे माजी विद्यार्थी सुधीर शिंदे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक रामदास भोर व सुनील ढोबळे उपस्थित होते. याप्रसंगी भारतीय लष्करात लेफ्टनंट पदी नियुक्ती झाल्याबद्दल उदापूरचे सुपुत्र देवेन नामदेव शिंदे यांचा विद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सरपंच सचिन आंबडेकर, प्रभाकर शिंदे, तुळशिराम शिंदे, संजीव शिंदे, अनिल तांबे, नितीन घोडेकर यांसह ओतूर व उदापूर परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी प्रास्ताविक, साईनाथ भोर यांनी परिचय करून दिला आणि योगेश गाढवे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पुरंदर विमानतळासाठी वाढीव मोबदल्यास मान्यता

## मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस आणि शेतकरी यांच्यामध्ये बैठक

पुणे । प्रतिनिधी

पुरंदर तालुक्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादनाचा एकरी दर वाढून देण्यास, तसेच मोबदल्याच्या स्वरूपात दहा टक्क्यांऐवजी वाढीव जमीन देण्यास आणि विमानतळ कंपनीत शेतकऱ्यांना भागीदार देण्यासह शेतकऱ्यांच्या मागण्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मान्यता दिली.

पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये विमानतळ होणार आहे. त्यासाठी तीन हजार एकर जागा संपादित करण्यात येणार आहे. राज्य शासनाने भूसंपादनाचा निश्चित केलेल्या मोबदल्यावर शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. तो दर वाढविण्याबरोबरच अन्य मागण्यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी शेतकऱ्यांना दिले होते. त्यानुसार मंगळवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सातही गावांतील शेतकरी, उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार विजय शिवतरे आणि जिल्हाधिकारी डुडी यांची एकत्रित बैठक झाली. भूसंपादनासाठी राज्य शासनाने प्रतिएकर एक कोटी रुपये दर निश्चित केला होता. तो



वाढवून नवीन मुंबई आणि समृद्धी महामार्गाप्रमाणे एकरी दर मिळावा. त्याचप्रमाणे भूसंपादनाच्या मोबदल्यात दहा टक्के जमिनीचा परतावा देण्यात येणार आहे. तो नवी मुंबई येथील विमानतळाचे भूसंपादन करताना जागा मालकांना साडेबावीस टक्के जमिनीचा परतावा देण्यात आला होता. आम्हाला ३५ टक्के जमिनीचा परतावा मिळावा. तर विमानतळासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या कंपनीमध्ये शेतकऱ्यांना भागीदारी देण्यात यावी. संपादनात जाणारी झाडे आणि घरांचा फेरमूल्यांकन करून दर निश्चिती करावी. घरे देताना एरोसीटीमध्येच घरे द्यावी, तसेच बांधकामासाठी वाढीव एफएसआय आणि टीडीआर वापरण्यास परवानगी द्यावी आदी मागण्या यावेळी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्या.

त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यास मान्यता देताना २०१३ आणि २०१९ च्या भूसंपादन कायद्याचा आधार घेऊन प्रतिएकरी भूसंपादनाचा जास्तीत जास्त दर देण्याची मागणी यावेळी मान्य केली. तर दहा टक्क्यांऐवजी जादा जागेचा परतावा देणे, विमानतळामध्ये शेतकऱ्यांना भागीदारी देण्यात येईल. तर ज्या शेतकऱ्यांची घरे व झाडे बाधित होणार आहेत. त्याचा जो मोबदला निश्चित करण्यात आला आहे. त्यांचे फेरमूल्यांकन करण्यात येईल, असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले.

# निष्ठावंताने पवारांची साथ सोडली : प्रशांत जगतापांच्या राजीनाम्याने पुण्यात पवारांच्या राष्ट्रवादीला हादरा

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पक्षाच्या प्राथमिक व क्रियाशील सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. पुणे महानगर पालिकेच्या समोर प्रशांत जगताप यांनी पत्रकार परिषद घेत राजीनामा दिला आहे. आजपर्यंत दिलेल्या संधीसाठी नेतृत्वाचे त्यांनी आभार मानले आहे. २७ वर्षांपूर्वी मी सामाजिक व राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले, तेव्हा कुठल्या पदासाठी नव्हे, तर पुरोगामी विचारांची चळवळ पुढे नेण्यासाठी मी कार्यरत झालो. आज २७ वर्षांनंतरही हेच एकमेव ध्येय माझ्या मनात आहे. यापुढेही पुरोगामी विचारांसाठी माझी सामाजिक व राजकीय वाटचाल सुरूच असेल असे जगताप म्हणाले. आजपर्यंत अत्यंत निष्ठेने मला साथ देणाऱ्या, यापुढेही संघर्षाच्या वाटेवर माझ्यासोबत येणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार जगताप यांनी मानले.

राज्यात २९ महापालिका निवडणुकांसाठी येत्या १५ जानेवारी रोजी निवडणूक होत आहे. मात्र त्याआधीच पुण्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी २२ डिसेंबर रोजी त्यांच्या पदाचा तसेच पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे सुपूर्द



केल्याची चर्चा होती. महत्त्वाचे म्हणजे दोन्ही राष्ट्रवादी पक्षांच्या संभाव्य युतीला प्रशांत जगताप यांनी दर्शवलेला तीव्र विरोध त्यांच्या राजीनाम्यास कारणीभूत ठरल्याचे बोलले जात आहे. तसेच दोन दिवसात आपण राजीनाम्याचा निर्णय घेणार आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले होते. यानंतर मंगळवारी आणि बुधवारी असे दोन दिवस प्रशांत जगताप यांनी खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याशी चर्चा केल्यानंतर अखेर शहराध्यक्ष आणि सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. प्रशांत जगताप यांनी आपली भूमिका मांडताना म्हटले की, एका पराभवामुळे भीती बाळगणारा मी नाही. विधानसभेत मी हरलो पण मला तिथल्या सगळ्या लोकांच्या प्रती मला आदर आणि मान असल्याचे जगताप यावेळी म्हणाले. पार्टी कशी निवडणूक लढवेल याची मी तयारी केली होती. माझ्यासारखा कार्यकर्ता व्यथित झाला होता. माझ्या मनात विचारांची घालमेल होती. पण घालमेल माझ्या आयुष्यावर उलटल्याचे प्रशांत जगताप म्हणाले. सद्विवेक बुद्धीला जागरूक ठेवून आणि सगळे प्रसंग डोळ्यासमोर ठेऊन आणि सगळ्या नेत्यांचा मान ठेऊन मी शहर अध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन बाहेर पडत आहे. मी राजकारणातून बाहेर गेलो नाही असेही त्यांनी सांगितले. मी राजीनामा शशिकांत शिंदे यांना मेल केला आहे. नगरसेवक पदाची निवडणूक मी लढवणार असल्याचे प्रशांत जगताप यांनी सांगितले. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करण्याची मला संधी मिळाली. पक्षात खूप चांगल्या पद्धतीने मी कामकाज केले. हडपसर वानवडी परिसरातील नागरिकांनी मला दादा दिली. मी रस्त्यावर उतरून काम केले. हे मी पुणेकर यांच्यासाठी केले. त्यामुळे मी सर्वप्रथम शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांचे आभार मानतो. मी कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या घरातून आलो आहे. मात्र आज मी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार शहराध्यक्ष पदाचा आणि सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. मी शशिकांत शिंदे यांना राजीनामा पाठवला आहे, अशी

# महापालिका निवडणुकीत पैशांच्या वापरावर इन्कमटॅक्स विभागाचा वॉच

## आळा घालण्यासाठी सर्व दिवस २४ तास नियंत्रण कक्ष

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीत पैशांच्या वापरावर इन्कमटॅक्स (प्राप्तीकर विभाग) विभाग वॉच ठेवणार असून, वारेमाप खर्चावर आळा घालण्यासाठी सर्व दिवस २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षात नागरिकांनी माहिती कळवावी यासाठी टोल फ्री क्रमांक देण्यात आला आहे. तसेच व्हॉट्स ॲप, एसएमएस किंवा इमेलद्वारेही नागरिक माहिती देऊ शकतात, असे विभागातर्फे कळवण्यात आले आहे.




राज्यातील महानगरपालिका निवडणुका, २०२५-२६ दरम्यान पैशांच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी इन्कमटॅक्स विभाग कटिबद्ध आहे. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करण्याच्या आणि निवडणुकीची शुचिता राखण्याच्या उद्देशाने, प्राप्तिकर विभाग पुणेद्वारे सर्व दिवस चोवीस तास नियंत्रण कक्षाचा समावेश असलेली निवडणूक देखरेख यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे

ठाणे, उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, भिवंडी निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई विरार, पनवेल, अहिल्यानगर, पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड हे विभाग पुणे विभागात येतात.आचारसंहिता लागू असेपर्यंत ही यंत्रणा कार्यरत राहील. निवडणूक प्रचारासाठी रोख रकमा आणि मौल्यवान वस्तूंचा गैरवापर होत असल्यास, त्याबाबत माहिती देण्यासाठी नागरिकांना सक्षम करणे हा यामागील उद्देश आहे.





# शौर्यदिन निर्विघ्नपणे पार पडणार पोलीस आयुक्त अमितेश कुमार

लोणिकंद । प्रतिनिधी

दि. १ जानेवारी २०२६ रोजी मौजे पेरणे येथे होणाऱ्या विजयस्तंभ शौर्य दिन अभिवादन सोहळ्यासाठी येणाऱ्या लक्षावधी अनुयायांना सुरक्षितता पुरविण्याच्या पार्श्वभूमीवर आज पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार तसेच महाराष्ट्र राज्याचे कायदा व सुव्यवस्था विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता यांचे सह अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विजयस्तंभ परिसराची पाहणी केली.

यावेळी कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून येणाऱ्या प्रश्नांविषयी त्यांनी आयोजक व स्थानिकांशी चर्चा देखील केली. यंदाचा उत्सव निर्विघ्नपणे तसेच कोणत्याही तणावाशिवाय पार पडणार असल्याने नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता १ जानेवारी रोजी अभिवादनासाठी यावे असे आवाहन यावेळी आयुक्तांकडून करण्यात आले.यावेळी पुणे सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुधीर हिरेमठ , अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील , पोलिस अधीक्षक संदिपसिंह गिल , पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, संदिप भाजीभीकरे , हिंम्मतराव जाधव यांचेसह अनेक अधिकारी उपस्थित होते.

# शीतल तेजवानीला २७ डिसेंबरपर्यंत कोठडी

**पुणे । प्रतिनिधी**

**मुंढवा जमीन विक्री व्यवहारात शीतल तेजवानीच्या ऑफिसबॉयने कंपनीचा पार्टनर म्हणून अभिनिर्णय प्रक्रियेचा अर्ज, प्रतिज्ञापत्र आणि अधिकारपत्रावर स्वाक्षरी केल्याचे तपासात उघड झाले आहे. त्याअनुषंगाने झालेले व्यवहार, दस्ताच्या देवाणघेवाणीबाबत बावधन पोलीस तपास करत आहेत. त्यासाठी तेजवानीच्या पोलीस कोठडीत २७ डिसेंबरपर्यंत वाढ करण्यात आली.**



मुंढवा येथील सरकारी जमीन पार्थ पवारांची भागीदारी असलेल्या अमेडियाला विकताना सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी कुलमुखत्यार शीतल किसनचंद तेजवानी, कंपनीचा संचालक दिग्विजय पाटील आणि सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांच्याविरोधात बावधन ठाण्यात गुन्हा दाखल आहे. अटकेत असलेल्या तेजवानीच्या कोठडीची मुदत संपल्याने मंगळवारी (दि.२३) तिला न्यायालयात हजर केले.

पार्थ पवार आणि शीतल तेजवानी यांच्यातील पॉवर ऑफ टर्नी (मुखत्यारपत्र) व्यवहाराशी संबंधित महत्त्वाचे दस्तावेज सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी जाहीर केले आहेत. तेजवानीच्या वकिलांनीच दिलेल्या मुखत्यारपत्राच्या प्रत्येक पानावर पार्थ पवार यांची स्वाक्षरी असून, त्यांचे तेजवानीसह व्हॉट्सअप चॅटिंगही असल्याचा आरोप दमानिया यांनी केला आहे. त्याचा दाखला बावधन पोलिसांनी न्यायालयासमोर दिला.तेजवानीने दस्तासाठी वकिलांना दिलेली रक्कम आणि समाजमाध्यमात प्रसारित झालेल्या कागदपत्रांविषयी तपास करायचा आहे. त्यासाठी तेजवानीच्या कोठडीत वाढ करण्याची मागणी तपास अधिकारी वरिष्ठ निरीक्षक अनिल विभुते आणि सरकारी वकील नितीन अडागळे यांनी केली. न्यायालयाने ती मान्य केली.


# पेड न्यूजवर प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती लक्ष ठेवणार - आयुक्त श्रावण हर्डीकर समितीच्या अध्यक्षपदी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, तर सदस्य सचिवपदी किरण गायकवाड

पिंपरी । प्रतिनिधी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 'प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती' महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या सदस्य सचिवपदी विशेष अधिकारी किरण गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती निवडणुकीदरम्यान उमेदवारांच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करणे आणि 'पेड न्यूज' सारख्या प्रकारांवर लक्ष ठेवण्याचे काम करणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली.**

आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने विविध कक्ष कार्यान्वित केले आहेत. उमेदवारांच्या निवडणूक प्रचारार्थ प्रसारित होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे पूर्वप्रमाणन तसेच पेड न्यूज सारख्या प्रकारांवर देखरेख ठेवण्यासाठी सहा सदस्यीय प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापित करण्यात आली आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय विशेष शाखेचे पोलिस उपायुक्त प्रदीप जाधव, आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा उपजिल्हाधिकारी सुरेखा माने, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त अण्णा बोदडे, कायदा विभागाचे उपायुक्त राजेश आगळे हे समितीचे सदस्य आहेत. निवडणुकीदरम्यान उमेदवार व राजकीय पक्ष विविध मुद्रित माध्यमे, टीव्ही चॅनल्स, सोशल मीडिया आणि इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रचार करत असतात. यामध्ये बातम्यांच्या स्वरूपात पैसे देऊन (पेड न्यूज) प्रचार केला जाऊ नये, यासाठी ही समिती महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असे हर्डीकर यांनी सांगितले.

ही समिती निवडणुकीच्या काळात द्वेषपूर्ण वक्तव्ये आणि आचारसंहितेचा भंग करणाऱ्या मजकुरावरही लक्ष ठेवणार आहे. समितीचे मध्यवर्ती कार्यालय पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील माहिती व जनसंपर्क विभागात कार्यान्वित करण्यात आले आहे. एखादी व्यक्ती स्वतःच्या वैयक्तिक सोशल मीडिया हँडलवर राजकीय मत व्यक्त करत असल्यास, साधारणपणे त्याला





जाहिरात समजले जाणार नाही. मात्र त्यातून कायदा-सुव्यवस्था, सभ्यता, नीतिमत्ता, बदनामी किंवा न्यायालयाचा अवमान होता कामा नये. आचारसंहिता काळात कोणत्याही व्यक्तीस त्याच्या सोशल मीडियावर राजकीय पक्ष किंवा उमेदवाराच्या लेखी परवानगीशिवाय परस्पर जाहिरात किंवा प्रचार करता येणार नाही. अशा जाहिरात किंवा प्रचारासाठी पूर्वप्रमाणन बंधनकारक राहील आणि त्याचा खर्च यशास्थिती संबंधित राजकीय पक्ष किंवा उमेदवाराच्या खात्यात समाविष्ट करणे आवश्यक राहील. प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी जाहिरात प्रसारित करण्याच्या दिनांकाच्या किमान ५ कार्यालयीन दिवस पूर्वी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे अर्ज करावा लागेल. सदर अर्जाची नमुना प्रत व अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्राची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच क्यूआर कोड सुविधेद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर क्यूआर कोड सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात बॅनरद्वारे लावण्यात आलेले आहेत. जाहिरातीमध्ये समितीने सुचवलेले बदल, दुरुस्त्या किंवा वगळणे संबंधित पक्ष किंवा उमेदवारावर बंधनकारक राहील. पूर्वप्रमाणन मंजूर झाल्यानंतर अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येईल.मुद्रित माध्यमांतील जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन आवश्यक नाही, मात्र आचारसंहिता व कायद्यांचे उल्लंघन होता कामा नये. प्रचारासाठी मुद्रित साहित्यावर प्रतींची संख्या, प्रत क्रमांक, मुद्रणालय व प्रकाशकाचे नाव-पत्ता असणे आवश्यक असून, या आदेशाचे पालन न झाल्याचे आढळल्यास प्रेस अँक्ट व वेळोवेळी करण्यात आलेल्या इतर अधिनियमांनुसार कार्यवाही केली जाईल, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी हर्डीकर यांनी दिली. आयुक्त हर्डीकर म्हणाले, समाजमाध्यमांवरील माहितीचा मतदारांवर होणारा प्रभाव लक्षात घेता, समाजमाध्यमांचेही संनियंत्रण व देखरेख ठेवण्याचे काम या समितीकडून केले जाणार आहे. जाहीर प्रचाराचा कालावधी समाप्तीपासून ते मतदान संपल्यानंतर एक तासापर्यंत एक्झिट पोल किंवा जनमत चाचण्यांचे निष्कर्ष जाहीर करता येणार नाहीत. महापालिका निवडणुकांचा जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाज माध्यमे इत्यादी माध्यमांद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत. प्रसारमाध्यमांना माहिती उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका स्तरावर तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये माध्यम कक्ष स्थापन करण्यात आला आहे. याबाबतची सर्व माहिती व नियमावली महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

cmyk